RNI 47034/64

# लातूर समाचार
LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

LATUR लातूर | वर्ष ३४ वे | अंक १३२ वा | सोमवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२५ (सांज. दैनिक) | पोस्ट परवाना नं. L2/RNP/OMD-52/24-26 | पृष्ठे – ६ | मो:९४२२४७२५०२ | किंमत १ रुपया

आमच्याकडे सर्व प्रकारचे कॉम्प्युटर, नायलॉन रबरी शिक्के एका तासात तयार करून मिळतील

■ संपर्क ■

जडे ऑफसेट प्रिंटर्स



मित्र नगर, लातूर, फोन : २४२६०८

## मोदींचे ट्रम्प यांच्या मृत अर्थव्यवस्थेच्या विधानाला उत्तर

# भारत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर

**बंगळुरू/वृत्तसंस्था** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे नाव न घेता त्यांना उत्तर दिले. मोदींनी बंगळुरूमध्ये म्हटले की, भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. आपण १० व्या क्रमांकावरून पहिल्या ५ व्या क्रमांकावर आलो आहोत. लवकरच पहिल्या ३ मध्ये येऊ. ही ताकद सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनातून आली आहे. देशाच्या कामगिरीचा झेंडा आकाशात उंच फडकत आहे.

खर तर, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी ३१ जुलै रोजी भारतावर २५% कर लादला होता आणि भारत आणि रशियाला मृत अर्थव्यवस्था म्हटले होते. ट्रम्प म्हणाले होते की, भारत आणि रशियाला त्यांच्या अर्थव्यवस्थांसह बुडू द्या, मला काय फरक पडतो.

याशिवाय, ऑपरेशन सिंदूरबद्दल पंतप्रधान मोदी म्हणाले, भारतीय सैनिकांची दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानला गुडघे टेकण्याची क्षमता संपूर्ण जगाने पाहिली आहे. त्याच्या यशामागे आपल्या तंत्रज्ञानाची आणि मेक इन इंडियाची शक्ती आहे. बंगळुरूच्या तरुणांनीही यात मोठे योगदान दिले आहे.

**पंतप्रधानांनी ३ वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला**

पंतप्रधान रविवारी कर्नाटक दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी बंगळुरूमधील केएसआर रेल्वे स्थानकावर ३ वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला.




यामध्ये बंगळुरू ते बेळगाव, अमृतसर ते श्री माता वैष्णोदेवी कटरा आणि नागपूर (अजनी) ते पुणे या गाड्यांचा समावेश आहे.

पंतप्रधानांनी बंगळुरू आणि राज्यासाठी अनेक विकासकामांचे उद्घाटन आणि पायाभरणी देखील केली. या प्रकल्पांचा एकूण खर्च २२ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. पंतप्रधानांनी बंगळुरू मेट्रोच्या यलो लाईनचेही उद्घाटन केले. ही लाईन आरव्ही रोड (रागीगुड्डा) ते बोम्मासंद्रा पर्यंत जाईल.

पंतप्रधान मोदींनी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांच्यासोबतही ट्रेनमध्ये प्रवास केला.

**पंतप्रधान मोदींच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे...**

यलो मेट्रो लाईनच्या आगमनाने लाखो लोकांना फायदा होईल. आज ऑरेंज लाईनचा पायाभरणी समारंभही झाला. त्याच्या उद्घाटनानंतर, यलो आणि ऑरेंज मेट्रो लाईन्सचा २५ लाख लोकांना फायदा होईल. इन्फोसिससह अनेक मोठ्या कंपन्यांनी बंगळुरू मेट्रोला निधी दिला. याबद्दल कॉर्पोरेट क्षेत्राचे अभिनंदन.

२०१४ पूर्वी ७४ विमानतळ होते आणि त्यांची संख्या १६० पेक्षा जास्त आहे. फक्त ३ राष्ट्रीय जलमार्ग होते, आता ही संख्या ३० झाली आहे. ११ वर्षांपूर्वी ७ एम्स होते, आता २२ एम्स आणि ७०० वैद्यकीय महाविद्यालये आहेत. २०१४ पूर्वी भारताची एकूण निर्यात ४६८ अब्ज डॉलर्स होती. आज ती ८२४ अब्ज डॉलर्स आहे.

भारत जागतिक एआयच्या दिशेने पुढे जात आहे. सेमीकंडक्टर मिशनला गती मिळत आहे. मेड इन इंडिया चिप्स लवकरच उपलब्ध होतील. भविष्याशी संबंधित तंत्रज्ञानात भारत पुढे जात आहे.

पूर्वी आपण मोबाईल फोन आयात करायचो पण आज आपण टॉप ५ निर्यातदारांपैकी एक झालो आहोत. यामध्ये बंगळुरूची खूप मोठी भूमिका आहे. २०१४ पूर्वी आपली इलेक्ट्रॉनिक निर्यात ६ अब्ज डॉलर्स होती जी आता ३८ अब्ज डॉलर्स झाली आहे. ऑटोमोबाईल निर्यात १६ अब्ज डॉलर्स होती जी आता दुप्पट झाली आहे.

योग्य सुधारणा ही सर्वात मोठी जबाबदारी आहे. भारत सरकारने कायद्याला गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी जन विश्वास विधेयक मंजूर केले आणि लवकरच ते २.० देखील मंजूर करेल. राज्य सरकारनेही अशी विधेयके मंजूर करावीत.

यलो मेट्रो लाईनची लांबी १९.१५ किमी आहे आणि त्यात १६ स्थानके आहेत. या प्रकल्पावर सुमारे ७,१६० कोटी रुपये खर्च झाले आहेत. या हाय-स्पीड ट्रेन्स प्रवाशांना जलद, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा अनुभव देतील आणि प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करतील.

यलो लाईन सुरू झाल्यानंतर, बंगळुरू मेट्रोचे एकूण नेटवर्क ९६ किमी पेक्षा जास्त होईल, ज्यामुळे लाखो प्रवाशांना फायदा होईल.

**तिसऱ्या टप्प्यातील मेट्रो प्रकल्पाची पायाभरणी**

पंतप्रधान मोदी बंगळुरू मेट्रो फेज-३ चा पायाभरणी कार्यक्रमही करतील. त्याची किंमत १५,६१० कोटी रुपये आहे. त्याची लांबी ४४ किलोमीटरपेक्षा जास्त आहे. यात

# रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्या

## ईडीच्या आरोपपत्रात ५८ कोटींची बेकायदेशीर कमाई केल्याचा ठपका



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : प्रियांका गांधींचे पती आणि व्यावसायिक रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्याचे दिसून येते आहे. कारण ईडीच्या चार्जशीटमध्ये रॉबर्ट वाड्रांवर गंभीर आरोप करण्यात आला आहे. रॉबर्ट वाड्रांनी ५८ कोटींची बेकायदेशीर कमाई केली असा ठपका ईडीच्या आरोपपत्रात ठेवण्यात आला आहे. बेकायदेशीर मार्गाने केलेली कमाई ही आर्थिक अफरातफर मानली जाते. त्यामुळे अशा प्रकारे संपत्ती जमा करणं हा कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळेच रॉबर्ट वाड्रांच्या अडचणी वाढल्या आहेत.

**ईडीच्या आरोपपत्रात काय उल्लेख?**

व्यावसायिक आणि प्रियांका गांधींचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी ५८ कोटी रुपये बेकायदेशीर मार्गाने कमवले असा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. ५८ कोटींपैकी पाच कोटी रुपये ब्लू ब्रीज ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या मार्गाने आणि ५३ कोटी रुपये स्काय लाइट हॉस्पिटालिटी प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून वाड्रांच्या व्यवसाय क्षेत्रात पोहचले. या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून ही रक्कम कायदेशीर करण्याचा प्रयत्न झाला. मात्र या कंपन्यांच्या नावे आधीच काही गुन्हे आहेत. त्यामुळे हे प्रकरण समोर आले. आता रॉबर्ट वाड्रांच्या अडचणींमध्ये भर पडली आहे.

**ईडीने आणखी काय म्हटले आहे?**

ईडीने म्हटले आहे की रॉबर्ट वाड्रा यांनी स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी आणि BBTPL या कंपन्यांच्या मार्फत आर्थिक अफरातफर करुन ५८ कोटींची बेकायदेशीर कमाई केली. ही रक्कम त्यांनी त्यांच्या आलीशान रहाणीमानासाठी खर्च केली. आता या प्रकरणात ईडीकडून सखोल तपास सुरु आहे. आर्थिक अफरातफर नेमकी कशी करण्यात आली याचा तपास ईडीकडून केला जातो आहे. या दोन कंपन्यांच्या मार्फत रॉबर्ट वाड्रा यांनी स्थावर आणि जंगम अशा दोन्ही मालमत्ता खरेदी केल्याचाही आरोप ईडीने आरोपपत्रात केला आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जम्मू-काश्मीरात अजूनही धग..

जम्मू-काश्मीरात अजूनही धग दिसून येत असून भारतीय जवानावर हल्ला करण्यात येत आहे. नुकतेच दोन जवान यात शहीद झाले आहेत. अतिषय दुर्दैवी बाब म्हणजे पाकिस्तानी दहशदवादींचा शिरकाव चालूच आहे. पहलगाम मध्ये घटना घडल्यानंतर भारताने कठोर पावले उचलली आहेत. काही झाले तरी आता माघार नाही म्हणून पाकव्याप्त काश्मीर भागात हवाईदलाचे कमांडर पाठवुन तेथील अतिरेक्यांचे कॅम्प उद्धस्थ केले. मुळात बऱ्याच दिवसांनी पहलगाम या ठिकाणी हल्ला करणारा सैन्यदलाच्या हाती लागला. त्याचा खात्मा करण्यात आला. यावरून अनेकांनी भारतीय जवानाचे अभिनंदन केले तर काही पक्षाकडून हा तमाशा म्हटले आहे. कोणत्या वेळी कोणती भाषा वापरावी याचे भान नसलेले काही ही शब्द प्रयोग भारतीय जवानाचे मनोधैर्य खचवित आहेत. हे योग्य नाही. भारतीय जवान तसे धैर्याने लढतात. भारतीय जवानाचे कोणत्याही परिस्थिती मनेखचणारी भाषा वापरू नये. तसे पाहिले तर भाजपा प्रणित सरकारच्या अगोदर काँग्रेस म्हणजे संपुआचे सरकार होते. त्यावेळी तर मोठ्या प्रमाणात घुसखोरी होतीच, अधिक जवान मारले जात होते. देशाला एकतर्फी निर्णय घेणारे पंतप्रधान मिळाल्याने बऱ्याच प्रमाणात घुसखोरी थांबली आहे. जम्मू-काश्मीरातील स्थानिकांच्या प्रेमापोटी काही अप्रिय घटना घडत आहेत. पहलगाम येथील घटनेवरून बऱ्याच बाबी समजल्या आहेत. नाव व धर्म विचारून गोळ्या घालणे हे कृत्य तसे मानवतेला काळीमा फासणारे आहे. भारतीय असे नीच कृत्य करीत नाहीत मात्र पाकिस्तानी जे सध्याला मानवतेला काळीमा फासण्याचे काम करीत आहेत ते कोठे तरी थांबले पाहिजे. भारतीय जवान हे देशाची व देशातील नागरिकांची रक्षा करणारे आहेत. रात्रंण दिवस डोळ्यात तेल घालून काम करतात. तसे या भागात काम करणे आवघड असते. हवामानात सतत बदल होत असतो. अतिषय घनदाट जंगल आहे. डोंगराळ भाग आहे. अशा भागात संरक्षाणाचे काम करणे आवघड आहे. अशा कठिण परिस्थितीत भारतीय जवान काम करतात. भारतीयांचे संरक्षण करतात, त्यांच्या कार्याला तमाशा म्हणणे अतिषय चुकीचे आहे. जे काम म्हणणाऱ्याच्या पक्षाने धाडसाने केले नाही ते काही प्रमाणात सद्याचे सरकार करीत आहे. तसे पाहीले तर पुर्वीच्या सरकारपेक्षा या विद्यमान सरकारने दहशद वाद रोखला आहे. पुर्ण दहशदवाद संपविण्यात वेळ निघुन गेली. वास्तविक अतिरेक्यांना मदत करणारी त्यांच्याच जातीतील मंडळींनी राष्ट्रप्रेमी बनले पाहिजे. आपण जेथे राहातो. नाव कमवितो. सर्वस्व येथेच असताना जर चोरून मदत करीत असाला तर एक ना एक दिवस मदत करणाऱ्याचा हेच लोक खातमा केल्याशिवाय राहणार नाहीत. मुळात जे गद्दार आहेत. ते देशाशी गद्दारी करतात ते आपल्याला पुन्हा धोका देणार नाही कशावरून? हा विचार मनात ठेवून वाटचाल करणारे असू शकतात. त्यामुळे भारताशी गद्दारी करणारी व धोका देणाऱ्यांनी विचार केला पाहिजे की, आपण जे देशविरोधी काम करीत आहोत यात एक ना एक दिवस भस्म व्हावे लागेल. चुकीची शिक्षा एक ना एक दिवस मिळते. त्यामुळे जे चुकीचे आहे. धर्मविचारात लिहीले आहे. मत-पंथातमध्ये सांगितले आहे त्याचा तरी विचार केला पाहिजे. किती दिवस जवान शहीद करणार आहोत. किती दिवस भारतीय जवान अतिरेक्यांबरोबर लढा देणारे आहोत. याचा विचार केला पाहिजे. अनेक वर्षापासून पाकिस्तान हा भारतीय हद्दीत अतिरेकी घुसवित आहेत. त्याला स्थानिक सरकारचा आतून पाठींबा दिसून येत आहे. केवळ मतासाठी असेल तर ते योग्य नाही. भारताला मिळालेले स्वराज्य हे काही तसेच मिळाले नाही. शेकडोंच्या संख्येने फासावर जावे लागले. अनेकांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. ज्यांनी त्या काळात शिक्षा भोगली, त्यांना ब्रिटीश, निजामाचा त्रास काय कळेल? आज जे स्वराज्यात वावरत असताना काही ही बोलतात. तमाशा म्हणतात, त्यांना स्वराज्याची किंमत कळाली नाही. सर्वात महत्वाचे अहिंसेने स्वराज्य मिळाले नाही ही बाब लक्षात ठेवली पाहिजे. मिळालेल्या स्वराज्याचे सुराज्य अजून तरी झालेले नाही. जम्मू-काश्मीरची भुमीत स्वर्ग आहे. त्याची नासधुस करण्यात आली आहे. अतिरेक्यांनी खंडर केले आहे. सतत गोळ्याचा वर्षाव होतो. रस्त्यावर जवानाची पैरवी चालू असते. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यावर कोणता परिणाम होईल याचा विचार केला जात नाही. त्यामुळे वेळीच काही बाबीचा विचार करून जम्मूकाश्मीरातील जनतेनी भारतीयांना पुर्ण पाठींबा द्यावा. थोड्याशा लालचीपनामुळे इमान विकले जाणे योग्य नाही. पलगाम हल्ला रोखता आला असता जर स्थानिकांनी भारतीय जवानास मदत केली असती तर. आज पहलगाममध्ये जाण्याचा विचार सुद्धा करीत नाहीत. जेथे हिंसा घडते व घडण्याची शक्यता असते तेथे जीव कोण गमावतो? सर्वाधिक नुकसान हे जम्मूकाश्मीरातील स्थानिकांचे झाले आहे. वास्तविक काश्मीरातून अनेक हिंदु पंडितांना हाकलून लावले आहे. आता तेथे बाकीचे राहात असले तरी त्यांचे जीवन सुखकर नाही. सर्वात मोठा व्यवसाय हा पर्यटनाचा होता. जीवला धोका असल्याने येणाऱ्याची संख्या रोडावली आहे. एकतर डोंगराळ, घनदाट जंगले आहेत. सतत पडणारा पाऊस अनेक बाबीमुळे मोठे व्यवसायचा अभाव दिसून येत आहे. ही एक वस्तूस्थिती असल्याने स्थानिकांनी भारतीय जवानास सहकार्य केले पाहिजे. पाकिस्तानातून येऊन भारतीयावर सुनियोजित स्थळी हिंसा घडविणे हे आवघड काम आहे. हे काम केवळ स्थानिकांच्या मदतीने यशस्वी होवू शकते. त्यामुळे यापुढे जम्मू-काश्मीरातील जनतेनी विचारपुर्वक वागले पाहिजे. हिंसा ही अधिक काळ टिकली जाऊ शकत नाही. याचा परिणाम हा वाईट होतो. प्रगती होत नाही. त्यामुळे देशात सतत धगधगणारी बाब जम्मूकाश्मीरमध्ये दिसून येते. त्यामुळे वेळीच स्थानिकांची विचार बदलून भारतीय जवानास, पोलिस यंत्रणेस मदत केली पाहिजे.

# महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण-२०२५ : सर्वांसाठी घराच्या दिशेने वाटचाल : नंदकुमार बलभीम वाघमारे

राज्यातील सर्वांना घरे मिळावीत, पुनर्विकास प्रकल्पांना चालना मिळावी, झोपडपट्टीमुक्त राज्य व्हावे, शाश्वत आणि समावेशक शहरीकरण व्हावे या उद्देशाने राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण धोरण- २०२५ लागू केले आहे. सन २०३० पर्यत सर्वांसाठी सुरक्षित, परवडणारे आणि समावेशक घर उपलब्ध करून देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. राज्यातील विकासात पायाभूत सुविधांप्रमाणेच गृहनिर्माण क्षेत्राचा मोठा हातभार आहे. राज्याच्या गृहनिर्माण धोरणामुळे राज्याच्या गृहनिर्माण क्षेत्राला गती मिळेलच त्याच प्रमाणे आर्थिक विकासाला चालना मिळेल.

अठरा वर्षानंतर जाहीर झालेल्या या धोरणात विदाआधारित निर्णय प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता व पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर दिला आहे. या धोरणाच्या 'माझं घर, माझा अधिकार' या ब्रिदवाक्यातून सर्वांसाठी घरे या स्वप्नांची पूर्तता होण्याच्या दृष्टिने वाटचाल होईल. या धोरणामध्ये सामाजिक समावेशकता, शाश्वतता, परवडणारी घरे व पुननिर्माणशिलता या मूलभूत तत्वांचा विचार केला आहे.

**असे आहे गृहनिर्माण धोरण २०२५**

**प्रस्तावना, धोरणाची गरज व आवश्यकता –**

महाराष्ट्र हे भारतातील दुसरे सर्वाधिक लोकसंख्या असलेले आणि क्षेत्रफळानुसार तिसरे राज्य आहे, जे देशाच्या एकूण सकल देशांतर्गत उत्पादनात १३ टक्के योगदान देणारे एक अत्यंत गतिशील आर्थिक केंद्र म्हणून ओळखले जाते. औद्योगिकीकरण, सेवा क्षेत्रातील प्रगती आणि पायाभूत सुविधा विकासामुळे सध्या राज्याचे शहरीकरणाचे प्रमाण ४५ टक्के इतके असून, मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिक यांसारखी प्रमुख शहरे शहरी विकासाच्या केंद्रस्थानी आहेत. राज्यात २९ महापालिका, २४४ नगर परिषद आणि १४७ नगर पंचायतींच्या माध्यमातून शहरी प्रशासन कार्यरत आहे.

''सर्वांसाठी घर'' आणि ''झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र'' ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हे नवीन गृहनिर्माण धोरण तयार करण्यात येत आहे. या धोरणात आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक , अल्प उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गट यांच्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

हे धोरण ''माझं घर, माझा अधिकार'' या मूलभूत मार्गदर्शक तत्त्वावर आधारित आहे, जे २०३० पर्यत राज्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.

२००७ नंतरच्या गृहनिर्माण धोरणातील महत्त्वाचे बदल, जसे की मुंबईसाठी लागू करण्यात आलेले विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियम आणि उर्वरित राज्यासाठी लागू करण्यात आलेले एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियम यांचा विचार करण्यात आला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात मजुरांचे झालेले स्थलांतर, घरापासून कामाच्या ठिकाणी ये-जा करण्याच्या समस्यांमुळे मजुरांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी घर उपलब्ध करून देणे गरजेचे झाले आहे.

बांधकाम खर्च कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि हवामान बदलामुळे पर्यावरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचा गृहनिर्माण क्षेत्रात समावेश करणे आवश्यक झाले आहे.

गृहनिर्माण विभागाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण , महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण , शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांसारख्या विविध शासकीय संस्था, संघटना, विकासक आणि विषय तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा करून हे धोरण तयार केले आहे. धोरणाचा मसुदा २५ सप्टेंबर २०२४ रोजी संकेतस्थळावर प्रसिद्ध करून हरकतीसूचना मागवण्यात आल्या होत्या आणि सुमारे १८०० हरकतीसूचनांचा विचार करून हे धोरण अंतिम करण्यात आले.

**राज्याने या धोरणात स्वत:ला 'सुविधाकार, उत्प्रेरक, गृहशिल्पी (बिल्डर) आणि नियामक' म्हणून स्थान दिले आहे.**

धोरणाची उद्दिष्टे आणि तत्त्वे – या धोरणाचे उद्दिष्ट वस्तुनिष्ठ विदा (डेटा) आधारित निर्णय प्रक्रिया आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शाश्वत, परवडणारी, पर्यावरणपूरक आणि हवामान बदल सहनशील निवास व्यवस्था निर्माण करणे आहे.

**अ. धोरणाची उद्दिष्टे**

**गृहनिर्माण सुलभता :** २०३० पर्यत सर्वांसाठी परवडणारी, पर्यावरणपूरक व आधुनिक घरे उपलब्ध करून देऊन गृहनिर्माण सुलभतेचा उद्देश साध्य करणे.

**गृहनिर्माण गरज सर्वेक्षण व विषण :** २०२६ पर्यत राज्यभर, जिल्हा-निहाय गृहनिर्माण सर्वेक्षण करून पुराव्यावर आधारित नियोजन करणे.

आर्थिक वृद्धी व गतिमानता : गृहनिर्माण क्षेत्राचा आर्थिक वाढीस चालना देणारा घटक म्हणून विकास करणे, रोजगार निर्मिती व संबंधित उद्योगांना पाठबळ देणे.

**पर्यावरणीय शाश्वतता :** गृहनिर्माणासाठी पर्यावरणपूरक साहित्य व तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.

**परवडणारी घरे :** राज्यातील अतिदुर्बल घटकांसाठी परवडणाऱ्या, शाश्वत, सुरक्षित घरांची निर्मिती करणे.

**झोपडपट्टी पुनर्वसन :** झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करणे व राहणीमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे, झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्र साध्य करणे.

शहरी नियोजन व पायाभूत एकात्मिक सुविधांचा विकास : गृहनिर्माणास रस्ते, पाणी, मलनि:स्सारण इत्यादी आवश्यक पायाभूत सुविधांशी जोडून संघटित विकास साधणे.

**'वॉक टू वर्क' संकल्पना:** गृहनिर्माण व रोजगाराच्या संधी यांचा परस्परासंबंध प्रस्थापित करून प्रवासाचा वेळ कमी करणे.

नियमन व अंमलबजावणी: दर्जा, सुरक्षितता व परिणामकारक देखरेख सुनिश्चित करण्यासाठी गृहनिर्माण क्षेत्रातील नियमन अद्ययावित करणे.

**भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण :** प्रोत्साहन व सक्षम नियामक आराखड्याद्वारे राज्यात भाडे तत्त्वावरील घरांच्या वाढीवर लक्ष केंद्रित करणे.



**सर्वसमावेशक वाढ :** ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, नोकरदार महिला व औद्योगिक कामगार यांच्यासाठी विशिष्ट गरजांचा विचार करणे.

**आधुनिक तंत्रज्ञान :** टिकाऊ, किफायतशीर व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.

**स्वशासकीय संस्था व विचारवंतांचा सहभाग :** धोरण अधिक लोकाभिमुख व भविष्यवेधी बनवण्यासाठी स्वशासकीय संस्था व विचारवंतांचा सहभाग.

ब. धोरणाची तत्त्वे – परवडणारी, सर्वसमावेशक, शाश्वत आणि पुनर्निर्माणशील ही या धोरणाची चार मुख्य तत्त्वे आहेत.

**परवडण्याजोगे :** परवडणाऱ्या दरात जमीन, चटई क्षेत्र निर्देशांक प्रोत्साहन, शुल्कात सवलत इत्यादींद्वारे घरांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

आर्थिक सहाय्य व गृहनिर्माणासाठी वित्त पुरवठा करून स्वस्त किमतीत घरे उपलब्ध करणे.

बांधकाम स्वस्त असले तरी गुणवत्ता आणि सुरक्षिततेचे किमान निकष पाळणे.

**सर्वसमावेशक :** आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक आणि अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी सामाजिक गृहनिर्माण व आर्थिक सहाय्य.

ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिकदृष्ट्या विकलांग रहिवाशांना सर्व गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये सुलभ प्रवेश सुनिश्चित करणे.

नोकरदार महिला आणि विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, परवडणाऱ्या आणि दर्जेदार घरांची उपलब्धता सुनिश्चित करणे.

**शाश्वत :** गृहनिर्माण बांधकामादरम्यान पर्यावरणपूरक आणि टिकाऊ पद्धतींचा वापर सुनिश्चित करणे (कमी वापर, पुनर्वापर व पुनर्निमाणशील'' –).

ऊर्जा कार्यक्षमता, नूतनीकरणक्षम ऊर्जा एकत्रीकरण, जलसंधारण, शाश्वत व पुनर्प्रक्रिया केलेल्या सामग्रीचा वापर, कार्यक्षम जागेचे नियोजन यास प्रोत्साहन.

हरित इमारत मानकांचा समावेश करणे आणि हरित इमारत प्रमाणपत्रांसाठी प्रोत्साहन देणे.

**पुनर्निर्माणशील :** हवामान बदल विचारात घेऊन, पर्यावरणाचा ऱ्हास कमी करणारे, आपत्तींमुळे होणारी हानी मर्यादित करणारे आणि आपत्तीनंतर पुनर्निर्माण सुलभ करणारे गृहनिर्माण आवश्यक आहे.

यात जमिनीचा सक्षम वापर, पर्यावरणपूरक इमारतींचे नियोजन, टिकाऊ बांधकाम साहित्य, पूररोधक व पूरनियंत्रण नियोजन, उष्मारोधक बांधकाम साहित्य, तंत्र व तंत्रज्ञान यांचा समावेश होतो.

**३. धोरणात्मक उपाय धोरणात्मक उपायांमध्ये अनेक पैलूंचा समावेश आहे:**

**अ. डेटा-आधारित निर्णय**

गृहनिर्माण गरज व मागणी सर्वेक्षण: राज्य सरकार संपूर्ण राज्यभर गृहनिर्माण गरजेचे मूल्यांकन करण्यासाठी व्यापक सर्वेक्षण राबवणार आहे, जे २०२६ पर्यत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे प्रत्येक जिल्हा-निहाय गृहनिर्माण गरज समजून घेण्यास मदत होईल.

राज्यस्तरीय गृहनिर्माण माहिती पोर्टलची निर्मिती गृहनिर्माण क्षेत्रासाठी डेटा-आधारित धोरण आणि निर्णय प्रक्रिया राबवण्यासाठी ''राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल विकसित करणे प्रस्तावित आहे. यात मागणी आणि पुरवठा दोन्ही बाजूंनी डेटा संकलित करून विषण केले जाईल. हे पोर्टल जिल्हास्तरीय भूमी निधी कोष आणि विविध योजनांची माहिती उपलब्ध करून देईल, ज्यामुळे पारदर्शकता आणि गतिशीलता वाढेल.

निवासी वापरासाठी योग्य शासकीय जमिनींची भूमी निधी कोष आधारसामग्री तयार करणे: सार्वजनिक प्राधिकरणांद्वारे गृहनिर्माण करताना उपलब्ध शासकीयनिमशासकीय प्राधिकरणांच्या जमिनींची माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध झाल्यास गृहनिर्माण योजनांचे नियोजन सुलभ होते. यासाठी राज्यव्यापी सर्वेक्षण करून भूमी निधी कोष तयार करण्याचे उद्दिष्ट ३१ मार्च २०२६ पर्यत पूर्ण करायचे आहे.

ब. परवडणाऱ्या गृहनिर्माण साठ्याची निर्मिती – राज्याने २०३० पर्यत आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक आणि अल्प उत्पन्न गट यांच्यासाठी ३५ लाख घरे बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे, ज्यासाठी ७०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. पुढील १० वर्षात ५० लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे.

**नवीन गृहनिर्माण** –सर्वसमावेशक गृहनिर्माण : १० लाख व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महापालिका हद्दीतील ४००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या भूखंडावरील प्रकल्पांमध्ये किमान २०म बांधकाम क्षेत्र म्हाडाकडे वितरण करणे अनिवार्य आहे. शासनाने सर्वसमावेशक गृहनिर्माणांतर्गत किमान ५ लाख घरांच्या निर्मितीचे लक्ष्य ठेवले आहे.

औद्योगिक कामगारांसाठी गृहनिर्माण: कामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणाजवळ सुरक्षित, परवडणारी घरे उपलब्ध होणे आवश्यक आहे, त्यामुळे प्रवासाचा खर्च वाचेल आणि उत्पन्नात वाढ होईल. ''वॉक टू वर्क'' संकल्पनेनुसार, एमआयडीसी क्षेत्रात १०म ते ३०म जमीन गृहनिर्माणासाठी राखीव ठेवण्यात यावी.

ज्येष्ठ नागरिकांसाठी गृहनिर्माण: सन २०३६ पर्यत महाराष्ट्रात ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या १७म पर्यत पोहोचण्याचा अंदाज आहे. ज्येष्ठ नागरिक गृहनिर्माणाला इमारतीच्या वापरासाठी एक स्वतंत्र प्रवर्ग म्हणून ओळखले जाईल. या प्रकल्पांसाठी विविध प्रोत्साहन दिले जातील.

विद्यार्थ्यांसाठी गृहनिर्माण: शहरांमध्ये स्थलांतरित विद्यार्थ्यांचा ओघ वाढत आहे. विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेली सर्व गृहनिर्माण मालमत्ता केवळ भाडे करारावरच वितरित केली जाईल. विद्यापीठाजवळच्या जागेत विद्यार्थी गृहनिर्माणासाठी क्षेत्र निश्चित केले जाईल.

**नोकरदार महिलांसाठी गृहनिर्माण:** महाराष्ट्रातील महिला कामगार वर्गाचा सहभाग ३१म आहे. नोकरदार महिलांसाठी विकसित केलेली सर्व गृहनिर्माण मालमत्ता केवळ भाडे करारावरच वितरित केली जाईल. प्रमुख नोकरी केंद्रांपासून ५ किलोमीटर अंतरावर ही गृहनिर्माण केंद्रे असतील.

एकात्मिक वसाहतींमध्ये परवडण्याजोगी गृहनिर्माण ४० हेक्टर (१०० एकर) किंवा त्याहून अधिक क्षेत्रावर एकात्मिक वसाहत प्रकल्प राबवण्यास परवानगी आहे, ज्यात किमान १५म मूळ निवासी चटई क्षेत्र निर्देशांक सामाजिक गृहनिर्माणासाठी राखीव असेल.

**प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी गृहनिर्माण:** प्रकल्पबाधित लोकांसाठी पर्यायी घर, निश्चित भरपाई आणि उपजीविकेसाठी सहाय्य प्रदान करण्याची तरतूद सुनिश्चित केली जाते. मुंबईतील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अंदाजे ५०,००० प्रकल्पबाधित व्यक्तींसाठी घरांची आवश्यकता आहे. तसेच मुंबई विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी २,२०,००० घरांची गरज असल्याचे टास्कफोर्सच्या निर्दशनास आले आहे.

**मध्यम उत्पन्न गटांसाठी परवडण्याजोगी गृहनिर्माण:** शासनाने मध्यम उत्पन्न गटासाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी खाजगी बाजारपेठांना प्रोत्साहन देण्याची योजना आखली आहे. यात निवास खरेदीसाठी व्याज सवलत, अधिमूल्य व विकास शुल्क विकासक हप्त्यांमध्ये शुल्क भरण्याची मुभा या उपाययोजनांचा समावेश.

शासकीय कर्मचारी आणि विशेष प्रवर्गासाठी गृहनिर्माण योजना : शासकीय कर्मचारी आणि विशेष प्रवर्गातील (माजी सैनिक, स्वातंर्त्यसेनानी, दिव्यांग व्यक्ती, कलाकार, पत्रकार इ.) घटकांसाठी विशेष गृहनिर्माण योजना राबवण्याचे प्रयत्न केले जातील. तसेच मुंबईसारख्या शहरांमध्ये आरोग्य सेवेसाठी प्रमुख रुग्णालयांजवळ रुग्णांच्या नातेवाईकांसाठी भाडेतत्वावर गृहनिर्माण करणे तसेच नवीन प्रस्तावित विमानतळांजवळ कामगारांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे प्रस्तावित आहे.

परवडण्याजोगी भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण: परवडणाऱ्या भाड्याच्या घरांच्या गरजेसाठी धोरणात्मक उपाययोजना प्रस्तावित आहेत, ज्यात खाजगी विकासकांना करात सूट, सबसिडी आणि नियमांमध्ये शिथिलता यांचा समावेश आहे.

**पुनर्विकास:**

स्वयं-पुनर्विकास (ड्ङशश्रष-ठशवर्शींशश्रेशिपीं): जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या गृहनिर्माण संस्थांना स्वयं-पुनर्विकासासाठी प्रोत्साहन दिले जाते. पात्र प्रकल्पांना अतिरिक्त १०म चटई क्षेत्र निर्देशांक मिळेल. तसेच ९ मीटरपेक्षा कमी रुंदी असलेल्या रस्त्यालगतच्या भूखंडासाठी ०.४ टक्के चटईक्षेत्र मोफत देण्यात येईल, यासह इतर सवलती, प्रोत्साहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी स्वयं-पुनर्विकास कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. यामार्फत सहकारी गृहनिर्माण संस्थांना आवश्यक ते सर्व सहाय्य करण्यात येईल.

समूह पुनर्विकास शहरीकरणाच्या प्रक्रियेत एकल इमारतींचा पुनर्विकास न करता समूह पुनर्विकास केल्यास नागरी पुनरुत्थानाची प्रक्रिया अधिक समाजाभिमुख होते.

जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास – याअंतर्गत एमएमआर साठी तयार करण्यात येणाऱ्या आर्थिक मास्टर प्लॅन अंतर्गत १० लाख परवडणाऱ्या घरकुलांची निर्मिती करणे आणि त्यासाठी पुनर्विकासाला प्रोत्साहण देण्यात येणार आहे.तसेच म्हाडाच्या वसाहती, जुन्या भाड्याने दिलेल्या इमारती तसेच उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विविध उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत.

**झोपडपट्टी पुनर्वसन व पुनर्विकास–**

या अंतर्गत मोठ्या खासगी जमिनीच्या भूखंडावर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. यामुळे झोपडपट्टी रहिवाशांची संमती आवश्यक नाही, विकासकाकडे योजना वेळेत पूर्ण करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध राहिल तसेच मोठ्या क्षेत्रामुळे झोपडपट्टी रहिवाशांसाठी पर्यायी संक्रमण शिबिरांची तरतूद होईल.

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये नवीन झोपडपट्ट्या निर्माण होऊ नयेत, यासाठी गृहनिर्माण विभागात विशेष अंमलबजावणी विभाग स्थापन करण्यात येणार आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील खाजगी जमीन मालकांना २५ टक्के नुकसान भरपाई प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.

विविध कारणांमुळे ठप्प पडलेल्या सार्वजनिक जमिनींवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंबंधित विकासक म्हणून झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणास प्रस्तावित करण्यात आले आहे.

एका प्रभागातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक झोपडपट्ट्या असल्यास त्या समूह म्हणून पुनर्विकसित करता येतील. याशिवाय इतर अनेक सुविधा झोपडपट्टी पुनर्विकासासाठी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

**क. हरित इमारत उपक्रम आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान**

नावीन्यपूर्ण बांधकाम तंत्रज्ञान: नवीन, नावीन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक बांधकाम तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे महत्त्वाचे आहे, ज्यामुळे बांधकाम खर्च कमी होईल आणि गुणवत्ता सुधारेल. तसेच हरित पद्धती स्विकारणाऱ्या क्लस्टर प्रकल्पांना तंत्रज्ञान नवोपक्रम अनुदान प्रदान करणे, पुरस्कार देणे, नवीन बांधकाम सामग्री आणि नवीन तंत्रज्ञानाचा समावेश निविदा प्रक्रियेत करणे आदींची शिफारस करण्यात आली आहे.

हरित (पर्यावरण पूरक) इमारत उपक्रम: इमारती पर्यावरणदृष्ट्या टिकाऊ आणि ऊर्जा कार्यक्षम बनवण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी पारिस्थितीकीय (इको) निवास संहितेचा स्वीकार करणे, प्रकाशविद्युत चालक सौरपट्ट बसविणे, टिकाऊशाश्वत साधनसामग्रीचा वापर करणे, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे वापरणे, वृक्षारोपण करणे, उष्णतेपासून दिलासा मिळण्यासाठी उपाययोजना करणे, हरित इमारतींचे प्रचालन आणि परिक्षण करण्यासाठी प्रोत्साहन देणे आदी उद्दिष्टे प्रस्तावित आहे.

हरित इमारतींच्या विकासकांना ३ टक्के, ५ टक्के आणि ७ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे.

**ड. इतर धोरणात्मक उपाय**

**गृहनिर्माण व बांधकामासाठी वित्तपुरवठा धोरण (महाआवास फंड) :** परवडणाऱ्या व सर्वसमावेशक गृहनिर्माण क्षेत्रात गुंतवणूक सुरू करण्यासाठी, राज्य शासनाने २०,००० कोटी रुपयांच्या संभाव्य खर्चासाठी आवश्यक असलेल्या व्यवहारी तूट भरपाई अनुदानाचा मोठा हिस्सा 'परवडणारे गृहनिर्माण निधी'द्वारे उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित केले आहे.

**व्यवसाय सुलभता :** बांधकाम प्रकल्पांसाठी बांधकाम परवानग्या, पर्यावरण मंजुरी व भोगवटा प्रमाणपत्र यांसह प्रभावी संगणकीकृत प्रक्रिया तसेच एक खिडकी निपटारा प्रणाली लागू करण्यात येईल. विविध अधिमूल्य भरण्याच्या तरतुदीमध्ये समानता सुनिश्चित करणे, प्रकल्प मंजुरीमध्ये सुस्पष्टता, पारदर्शक भूसंपादन प्रक्रिया, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा,गृहनिर्माण क्षेत्राला पायाभूत सुविधांचा दर्जा देणे, आदी उपाय सुचविण्यात आले आहेत.

**स्थावर संपदा नियामक प्राधिकरण :** महारेराच्या सक्षमीकरणासाठी पुरेसा कर्मचारीवर्ग, प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांसाठी सेवा प्रवेश नियम तयार करणे, तक्रार निवारणासाठी पुरेसी खंडपीठ व सदस्य संख्या असावी यासाठी उपाययोजना करण्यात प्रस्तावित आहे.

**शहर नियोजन सुधारणा :** याअंतर्गत डिजिटल हस्तांतरणीय विकास हक्क प्रमाणपत्र वाटप यंत्रणेसाठी ऑनलाईन बँक पोर्टलअप्लिकेशन तयार करणे, दर्जेदार विरंगुळा स्थळांची निर्मिती करणे, संक्रमणाभिमुख विकास क्षेत्रांमध्ये परवडणाऱ्या गृहनिर्माणासाठई उत्तेजन देणे, उपवर्तीउपनगरीय शहरे विकसित करणे, आदी उपाययोजना व सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत.

याशिवाय ऑनलाईन सुधारणांमध्ये सहभागी नियोजन, सुलभ नियामक प्रक्रिया आणि कार्यक्षम प्रशासन व प्रतिसादक्षम शहरी व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी तंत्रज्ञानाचा समावेश यावर भर दिला आहे.

परवडणाऱ्या गृहनिर्माणात कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व सुकर करण्यासाठी धोरणात सुधारणा करणे: परवडणाऱ्या गृहनिर्माण क्षेत्रात कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व योगदान सुलभ करण्यासाठी विविध उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

**क्षमता निर्मिती व कौशल्य विकास :** बांधकाम कामगारांच्या क्षमता वाढीसाठी नवीन कौशल्य विकास केंद्रे उभारणे, विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अद्ययावतीकरण करणे, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळासोबत भागीदारीतून उपक्रम हाती घेणे, सार्वजनिक प्राधिकरणांची क्षमता वाढविणे, खासगी क्षेत्रांना कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यासाठी सहभागी करणे आदी उपाययोजना राबविण्यात येणार आहे. तसेच धोरणात्मक चौकट अधिक बळकट, समावेश व विस्तृत करण्यासाठी नॉलेज पार्टनरची नियुक्ती तसेच बांधकाम तंत्रज्ञान अनुसंधान केंद्राची स्थापना करण्यात येणार आहे.

**बांधकामाच्या जागांवरील अपघातांची जबाबदारी:** बांधकामाच्या जागेवरील कोणत्याही अपघाताची जबाबदारी सुरक्षा व्यवस्थापक व कंत्राटदारापेक्षा विकासकाची आहे. यासंदर्भात अधिनियमात अनुरूप बदल करणे प्रस्तावित आहे.

**गुणवत्ता नियंत्रण –** प्रकल्पांच्या बांधकामात गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

पुनर्विकासाकरिता तक्रार निवारण समिती: झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या धर्तीवर पुनर्विकासाकरिता राज्यस्तरीय सर्वोच्च तक्रार निवारण समितीची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे.

या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे राहणीमान सुधारणार आहे, तसेच राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासातही महत्त्वपूर्ण योगदान मिळणार आहे, जिथे प्रत्येक नागरिकाला योग्य घराची प्रतिष्ठा आणि सुरक्षितता मिळेल.

# रात्रीचे भोजन आणि आरोग्य

शरीराला जडणाऱ्या बहुतेक व्याधींचा थेट संबंध पोटाशी आहे हे विधान आयुर्वेदाने अनेक शतकांपूर्वी करून ठेवले आहे. किंबहुना रात्रीचे भोजन संध्याकाळी सात वाजण्याच्या आत संपविणे हा आरोग्याचा मूलमंत्र असल्याचेही तज्ञांचे मत आहे. रात्रीचे भोजन आणि झोपेची वेळ यांमध्ये किमान तीन तासांचे अंतर असणे आवश्यक असल्याचे आहारतज्ञ सांगतात. मात्र आजच्या काळामध्ये कामाच्या निमित्ताने घराबाहेर राहणाऱ्या मंडळींना, सातत्याने प्रवास किंवा नाईट शिफ्टस करणाऱ्या मंडळींना हा आरोग्यनियम अवलंबणे सहज शक्य होणारे नसते.

आयुर्वेदाच्या अनुसार आपल्या शरीराची पचनसंस्था अनेक गोष्टींवर अवलंबून असते. सूर्योदय होतो तेव्हा जठराग्नीही प्रदीप्त होत असतो, आणि शरीरातील पचनक्रिया सक्रीय होत असते. आणि सूर्य मावळतो, तेव्हा जठराग्नी मंद होत असतो व त्याचबरोबर पचनक्रियाही



मंदावते. म्हणूनच प्राचीन काळामध्ये सूर्यास्तापूर्वी रात्रीचे भोजन घेण्याची पद्धत रूढ होती. सूर्यास्तानंतर घेतलेले भोजन व्यवथित पचत नसून, ते आतड्यांमध्ये राहते आणि सडते. त्यामुळे शरीरामध्ये निरनिराळे विषारी घटक तयार होत असतात. म्हणूनच रात्री उशीरा भोजन घेण्याची सवय असणाऱ्या व्यक्तींमध्ये अपचन, गॅसेस, पोट फुगणे, पित्त, रात्रीची झोप शांत न लागणे इत्यादी समस्या जास्त आढळतात.

पण ज्या व्यक्ती कामानिमित्त रात्री उशीरापर्यंत बाहेर राहतात, किंवा ज्यांना काही ना काही कारणामुळे सूर्यास्तापूर्वी भोजन घेता येत नाही अश्या मंडळींनी काय करावे? सूर्यास्तापूर्वी भोजन घेणे सर्वोत्तम आहे हे जरी आयुर्वेदाने सांगून ठेवले असले, तरी ज्यांना भोजन रात्री उशीरा घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, त्यांनी अन्नाचे पचन व्यवस्थित व्हावे आणि पचनाशी निगडित समस्या उद्भवू नयेत यासाठी काय करावे, याचे उपाय देखील आयुर्वेदानेच सांगितले आ-हेत. रात्री उशीरा जेवणार असाल, तर भोजनापूर्वी एका लहानशा आल्याच्या तुकड्यावर काळे मीठ भुरभुरावे आणि हा आल्याचा तुकडा चावून खावा. आल्याचा रस, त्यातील फायबर आणि काळे मीठ यामुळे पचनक्रिया सक्रीय होण्यास मदत होते. त्यामुळे रात्री उशीराने घेतलेले भोजनही व्यवस्थित पचण्यास मदत होते.

# अतिरेक नको!



कबुतर हे खरं तर शांततेचे प्रतीक. पण, या शांततेच्या प्रतीकानेच सध्या मुंबईत अशांतता निर्माण झाली आहे. शांतता, अहिंसा आणि जीवदयेवर अतोनात श्रद्धा असलेल्यांना आपल्या या श्रद्धेच्या समर्थनार्थ हातात चाकू-सुरे घ्यावे लागत आहेत! 'अहिंसेच्या रक्षणार्थ हिंसा झाली तरी हरकत नाही' यासारखी विधानंही कोणी करू लागले आहेत!! आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ भाषा वापरतानाही विवेकाची पातळी सोडू नये, ही शिकवण हल्ली लोप पावत चालली आहे. शिवाय, परमतसहिष्णुता म्हणूनही काही गोष्ट असते. दया, करुणा सहिष्णुतेची अनेक अंगं, अनेक आविष्कार आहेत. त्यातलं कुठलं एक दर्शनच खरं, तेच अंतिम असं मानणं म्हणजे 'विश्वाचं अंतिम सत्य आपल्यालाच उमगलं' असा दावा करण्यासारखं आहे. हा दावा कोणाला करायचा असेल, तर हरकत नाही. पण, त्यातून आपण आपल्यालाच परमपूजनीय असलेल्या महापुरुषांच्या पुढे जातो आह-ोत, हे समजून घेतलेलं बरं. उच्चरवात आक्रमक बोलणं हा सध्याच्या जमान्याचा रिवाजच झाला आहे. ज्यांची आत्मशांती हरवली आहे, असे लोक बाहेर अधिकाधिक वरच्या पट्टीत जातात. सर्वसामान्यांसाठी हे ठीक आहे. पण, ज्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य आत्मशांतीच्या शोधार्थ, आत्मिक अध्यात्मासाठी समर्पित केलं आहे, त्यांनी तरी समाजाला याचं भान दिलं पाहिजे. आ-पला तोल ढळणार नाही, याची काळजी स्वतःच घेतली पाहिजे. कबुतरांच्या विष्ठेने आणि त्यांच्या पंखांनी होणारं प्रदूषण आणि त्यातून माणसाला होणारे विकार राहिले बाजूला; त्याआधी हे प्रदूषण थांबवा, असं म्हणण्याची वेळ आली आहे. कबुतर हा संपूर्ण शाकाहारी पक्षी आहे, या धारणेपोटी त्याला शाकाहारी समाजात, विशेषतः जैन समाजात विशेष स्थान आहे. जैन समाजाच्या या धारणेपोटीच मुंबईत कबुतरखान्यांचा उगम झाला असावा. मुंबईत सध्या ५१ अधिकृत कबुतरखाने आहेत. याशिवाय जैन समाजाची वस्ती जिथेजिथे वाढत जाते, तिथेतिथे या कबुतरखान्यांची संख्याही वाढत जाताना दिसते. अशा अनौपचारिक कबुतरखान्यांची संख्या यापेक्षा अधिक असण्याची शक्यता आहे. खाण्यास आयतं आणि मुबलक मिळत असल्याने मुंबईतील कबुतरांची संख्या झपाट्याने वाढते आहे. गेल्या तीन वर्षांत ही संख्या दीडशे टक्क्याने वाढल्याने अतिसंख्येचे प्रश्न निर्माण झाले आहेत. विधान परिषदेत पावसाळी अधिवेशनात त्याचीच चर्चा झाली. त्या चर्चेच्या आनुषंगाने मुंबई महानगरपालिकेने कारवाई करायला घेतली. त्याच्या विरोधा-तून प्रकरण उच्च न्यायालयात गेलं. उच्च न्यायालयाने कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला. कबुतरप्रेमी त्यामुळे आक्रमक झाले आणि 'न्यायालयाला झुगारून देण्या'ची, 'प्रसंगी कायदा हातात घेण्या'ची, 'कबुतरांच्या संरक्षणासाठी हिंसा झाली तरी बेहत्तर' अशा आशयाची विधानं सुरू झाली.

भूतदया, प्राणी-पक्षीप्रेम वाईट आहे, असं कोणीही मनुष्यमात्र म्हणणार नाही. तसं कोणत्याच धर्मात नाही. उलट, पुण्यप्राप्तीचा हा सर्वात सोपा मार्ग सर्वत्र मानला जातो. पुण्यप्राप्तीबरोबरच पत्रिकेतील दोष, ग्रहदोष घालवण्यासाठी, किमानपक्षी त्याची तीव्रता कमी करण्यासाठी तरी असे मार्ग अवलंबावेत, असं सांगितलं जातं. पूर्वी केवळ ज्योतिषी, ग्रह गोलार्धाचे तज्ज्ञ म्हण-वणारे असं सांगत असत. आता 'यू-ट्युब'वर याचं पेव फुटलं आहे. पक्ष्यांना दाणापाणी, गाईंना (समस्या गंभीर असेल, तर विशिष्ट रंगाच्या!) चारापाणी, कुत्र्या-मांजरांची सेवा, असे नानाविध प्रकार सांगितले जात असल्याने त्यावर हुकूम उपाय करणाऱ्यांची संख्याही अतोनात वाढू लागली आहे. मुंबई किंवा तत्सम शहरांत त्याचे गंभीर दुष्परिणाम दिसू लागले आहेत. माणसांच्या स्थलांतराने शहरांचे व्याप नियंत्रणाबाहेर गेले आहेतच. त्यात प्राणी-पक्षांच्या वाढत्या संख्येने स्वच्छतेचे, नागरी समस्यांचे नवेच प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. सांडपाणी व्यवस्था, स्वच्छतेचा मुळात अभाव आणि त्यात ही नवी भर! अनेकांना याची जाणीव नाही; त्यामुळे, गांभीर्यही नाही. स्थानिक प्रशासनाला या समस्यांना तोंड द्यावं लागत असल्याने नागरी सुव्यवस्थेचा भाग म्हणून त्यांना काही पावलं उचलण्याची निकड भासते आहे. ज्यांना आपलं शहर सुव्यवस्थित, नेटकं असावं असं वाटतं, त्यांनी या यंत्रणांची भूमिकाही समजावून घेतली पाहिजे. कबुतरांचा त्रास नको, म्हणून स्वतःच्या घराला जाळ्या लावणाऱ्यांनी सार्वजनिक उपद्रवाचा विषयही समजून घेतला पाहिजे. कबुतरांची विष्ठा आणि पंखांचा मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची चर्चा वैद्यकीय भाषेत यापूर्वी झाली आहे. जेव्हां हे प्रमाण अति होतं, त्यावेळी होणारा दुष्परिणामही मोठा असतो. तरीही सरकार आणि न्याय यंत्रणेला तज्ज्ञांकडून अधिकृत आणि नेमका अहवाल आवश्यक वाटला, तर तेही योग्यच म्हणावं लागेल. अशा अहवालांच्या आधारेच शास्त्रीय निर्णय झालेला केव्हांही चांगलाच. तोपर्यंत कबुतरांना खायला घालण्याची जबाबदारी महापालिकेने स्वतः घेतली, हेही योग्यच म्हण-ता येईल. ज्यांना पुण्यच कमवायचं आहे, त्यांच्यासाठी अन्य अनेक मार्ग उपलब्ध आहेत. वैद्यकीय सुविधांसाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाला येणारे विनंतीअर्ज पाहिले, तर तिकडेही मदतीचा ओघ वाढवता येईल. शिक्षणासाठी गरीब विद्यार्थ्यांना मदत करता येईल. सरकारी प्राणीसंग्रहालयांच्या देणग्यांतही नियमित रक्कम पाठवता येईल. कुणाच्या जीवाशी खेळून कुणाचा जीव वाचवण्याला कुठे समर्थन मिळेल, असं वाटत नाही. आपल्या धार्मिक शिकवणीचा शिकवणुकीचा गाभा लक्षात घेऊन सगळ्यांनीच संयमाने वागावं, हे सर्वो

# क्लिनिकल सायकॉलॉजीस्ट काळाची गरज



सध्याचे जीवन खूपच अस्थिर आणि धकाधकीचे बनले आहे. कर्जबाजारी आणि नापिकीमुळे होणारी शेतकऱ्यांची आत्महत्या असो किंवा कमी मार्क पडण्याच्या धास्तीने एखाद्या विद्यार्थ्याने केलेली आत्महत्या असो, या बाबी मनोविकाराशी निगडित आहेत. मानसशास्त्रातील अध्ययनामुळे केवळ करिअरच नाही, तर मानवसेवा देखील आपल्या हातून घडू शकते. आगामी काही वर्षांत मोठ्या संख्येने क्?लिनिकल सायकॉलॉजिस्टची गरज भासू शकते.चांगल्या जीवनासाठी उत्तम शारीरिक आरोग्याबरोबरच उत्तम मानसिक आरोग्य असणेही तितकेच महत्त्वाचे मानले जाते. माणसाच्या मानसिक आरोग्याचे महत्त्व लक्षात घेऊन या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली असून, त्यावर अनेक विद्यापीठांतून संशोधन केले जात आहे. जर आपल्याला मानवी मेंदूतील रहस्य सोडवायचे असेल आणि मनोरुग्ण व्यक्तीवर उपचार करायचे असतील, तर फक्?लिनिकल सायकॉलॉजीफ हा एक चांगला पर्याय मानला जातो.

फक्?लिनिकल सायकॉलॉजीफ हा विषय मानसिक आरोग्याच्या समस्या समजून घेण्यासाठी आणि संपूर्ण मानसिक, भावनिक, तसेच आचार- विचारासंबंधी विकारांचा दबाव, चिंताग्रस्त, नैराश्य, मनोविकृती यावर प्रभावीपणे उपचार करून विकासाला प्रेरणा देण्याचे काम करते. माणसाचा चेहरा किंवा तो विचार कसा करतो हे ओळखण्याचे काम क्?लिनिकल सायकॉलॉजी शिकवते, असा अर्थ काढणे चुकीचे ठरते. कारण हा विषय केवळ यासंबंधी मिथक मानले जाते. मनुष्याचा मेंदू जेवढा गूढ आहे, तेवढीच त्याची कार्यप्रणाली देखील. क्?लिनिकल सायकॉलॉजीत माणसाच्या आ-चार- विचाराबाबत माहिती दिली जाते. या विषयात मानवाच्या मेंदूसंबंधी प्रकृती, प्रक्रिया, प्रतिक्रिया आणि अन्य बाजूंवर संशोधन केले जाते.क्?लिनिकल सायकॉलॉजीची वैशिष्ट्ये : मानसोपचारतज्ज्ञापेक्षा वेगळे क्?लिनिकल सायकॉलॉजिस्ट औषधे देत नाहीत. त्याचबरोबर विविध साधनांच्या आधारे मनोरुग्णाचे कारण समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

?लिनिकल सायकॉलॉजी क्षेत्राचे अनेक विभागांत वर्गीकरण करता येईल. त्यात कुटुंबव्यवस्था, सकारात्मक मनोविज्ञान, ट्रान्सपर्सनल, कॉग्निटिव्ह बिव्हेरियरल, सायकोडायनॅमिक, ह्यूमिनस्टिक किंवा एक्?झिस्टेंशियल यासारखी वैशिष्ट्ये आपल्याला पाहता येतील.

तज्ज्ञ मंडळी ताण, चिंता, स्क्रिझोफ्रेनिया, व्यसन आदींवर लक्ष केंद्रित करून मुले, ज्येष्ठ मंडळी, कुटुंबांचे संशोधन करून या क्षेत्रात प्रावीण्य मिळवितात.

कामाचे स्वरूप :

क्?लिनिकल सायकॉलॉजिस्टची गरज साधारणपणे रुग्णालय, खासगी सेवा किंवा शैक्षणिक संस्थेत भासते. आयुष्यात जाणवणाऱ्या शारीरिक आणि मानसिक आघातांतून बाहेर काढण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञ मदत करत असतात. अशा घटनांमुळे चिंता, ताण- तणाव, वर्तन, तसेच मानसिकसंबंधी आजाराचे कारण ठरू शकते. क्?लिनिकल सायकॉलॉजिस्टकडे कोणत्याही कॉलेज, विद्यापीठात संशोधन केल्यानंतर यासारख्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळू शकते. ज्यांना समुपदेशन आणि मानसिक आधार देण्याची गरज आहे, अशा मंडळींसाठी मानसोपचारतज्ज्ञ महत्त्वाची भूमिका बजावतात.कोणकोणते अभ्यासक्रम? : मानसशास्त्र हा विषय काही कॉलेजमध्ये अकरावी आणि बारावीला विषयाच्या रूपातून शिकवला जातो. बहुतांशी विद्यापीठांत मानसशास्त्र हा एक सामान्यप्रमाणे ऑनर्स विषय म्हणून शिकता येतो. मानसशास्त्रात पदव्युत्तर पदवी देखील मिळवता येते.

मानसशास्त्रात पदवी घ्यायची असेल, तर बारावीला सर्व विषयांबरोबर मानसशास्त्राचा समावेश असणे महत्त्वाचे आहे. तसेच एम.ए. करायचे झाल्यास पदवी अभ्यासक्रमाला मानसशास्त्राचा विषय असणे अनिवार्य आहे. या विषयात डॉक्?टरेट मिळवण्यासाठी यूजीसीकडून नेमलेल्या ज्युनिअर रिसर्च फेलोशिप लेक्?चररशिप परीक्षा (राष्ट्रीय पात्रता परीक्षा- नेट) किंवा विद्यापीठस्तरीय परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे.रोजगाराच्या संधी : अलीकडेच केलेल्या सर्व्हेक्षणात देशात मानसिक आजाराने पीडित असलेल्या लोकांची संख्या वाढत असल्याचे निर्दशनास आले आहे. त्या तुलनेत मनोचिकित्सकांची किंवा मानसोपचारतज्ज्ञांची संख्या कमीच दिसून येत आहे. आगामी काळात या समस्यांचा सामना करण्यासाठी मानसोपचारतज्ज्ञांची गरज भासणार आहे. क्?लिनिकल सायकॉलॉजीत पारंगत असणाऱ्या विद्यार्थ्याला सर्वच पातळीवर रोजगार करण्यासाठी संधी उपलब्ध आहे.

## स्वस्थ त्वचेकरता काय — डॉक्टर टीप्स



**टोमॅटो**

स्वस्थ त्वचेकरता जास्तीत जास्त टोमॅटो खाण्याचा प्रयत्न करा. टोमॅटो लाईकोपिन नावाच्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेला असतो जो आपल्या त्वचेत नैसर्गिकरित्या डझ्रऋ ला वाढवतो.टोमॅटो चा उपयोग सनस्क्रीन ला पर्याय म्हणुन करू नका.

लालभोपळा-यालाच काही लोक डांगर सुध्दा म्हण-तात. यात असलेल्या कैरोटिनोईड मुळे याचा रंग गडद नारंगी असतो. कैरोटीनोईड, लालभोपळयाशिवाय गाजरात देखील असतं जे चेहे-यावर लवकर सुरकुत्या येउ देत नाही आणि रॅडीकल्सशी सुध्दा लढतं, शिवाय तुमच्या त्वचेला चांगला आकार आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे. याशिवाय लालभोपळयात व्हिटामीन सी आणि दुसरे अँटी एजिंग व्हिटामीन देखील आढळतात जे तुमच्या त्वचेला स्वच्छ आणि स्वस्थ ठेवतात. **(क्रमश. )**

## विनोद




अतुल : बाबा, मला एक रुपया द्या

बाबा : गाढवा, एवढा मोठा झालास नि एक रुपया मागत-ोस?

अतुल : तर मग बाबा दहा रुपये द्या.

## संदेश

Santa : matlbi dost se bach kar raho.

Banta : magar matlbe dost ka pta kaise chalega.

Santa=simple,sare dosto ko msg karojo reply na de sam-jah lo wo hi matlbi hai.

## सुविचार



घुबड एकटे राहते म्हणून कोणी त्याला शहाणे समजत नाही.

\- टी. फुलर


**संस्कृत सुभाषित**

**दृष्टिपूतं न्यसेत् पादं, वस्त्रपूत पिबेज्जलम्।।**

**सत्यपूतां वदेद् वाचं, मनःपूतं समाचरेत्।।**

नीट पाहूनच जमिनीवर पाऊल ठेवावे, पाणी नेहमी वस्त्रातून गाळून घ्यावे, सत्याने पवित्र झालेले वचन बोलावे, मनाला जे पवित्र आणि सत्य वाटेल तसे वर्तन करावे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. रोग होण्यास अडथळा करणारे
६. अश्विनी पौर्णिमा
९. विटीदांडू खेळातील खड्डा
१०. अशुभसूचक चिन्ह
१२. बारा वर्षांचा काळ
१३. जून, कडक
१४. कपाळ
१६. खंदक
१७. गावाची हद्द
१८. वायू, हवा
२०. गणपतीचे एक नाव
२२. जोम, मस्ती
२४. निर्बुद्ध मनुष्य
२५. मारझोड
२६. चिवचिव, आवाजांचा गोंधळ
२८. एका बाजूस झुकणे
२९. कमी करणे
३१. हिंदीत सर्व
३२. घाण
३४. उणीव
३५. पंजाबमधील पाच नद्या
४१. आई
४२. चारही बाजूस पाणी असलेली जमीन
४३. व्यवस्था, उद्योग
४६. लक्ष्मीचे एक नाव
४८. झीज, नुकसान
४९. पोते, गोणपाट
५२. धोबी
५३. युद्ध
५४. ओटा
५५. कडक व चिवट
५६. सोसाट्याचा वारा-पाऊस
५७. दूर करणारा
५९. वर्ष, सन
६०. इनाम मिळालेला
६१. कोल्हापूरी दागिना
६२. डावखोरा
६३. चांदणी
६५. माध्यन्ह
६८. गणपतीचे वाहन
६९. 'लिटल चॅम्प्स'नी सादर केलेला 'झी'वरील कार्यक्रम
७२. माघारी येणे
७३. समतल
७४. रात्रीचा पहारेकरी
७५. तगडा

## उभे शब्द

१. रोग दूर करणारे (औषध)
२. जहाज
३. बोलण्यातील 'फेकाफेक'!
४. अलमारी
५. नोकर
६. ओरडणे
७. गमन करणे
८. पद्धतीनुसार
११. गोंजारणे, लाडीगोडी लावणे
१५. लाडावलेला (मुलगा)
१९. स्वत:वर संकट ओढवून घेणे या अर्थी एक हिंदी म्हण
२०. मोजणी करणारा
२१. चुरस, स्पर्धा
२३. शिडाचे जहाज
२५. सामान
२७. स्त्री, बाई
२८. अतिरेक, कहर
३०. झाडाची नवीन फूट
३१. नेहमी
३२. माझे
३३. संध्याकाळ
३४. करुणा, कीव
३५. चित्र रेखाटणारा
३६. वल्लारी
३७. घोड्याचे घर
३८. केसांची बट
३९. संतापी
४०. पूर्ण सविस्तार बातमी
४४. चंद्र
४५. शपथ
४६. भारताचे राष्ट्रीय फूल
४७. करपलेला भाग
४८. खोटे बोलणारा
५०. विपत्तीची कहाणी
५१. आश्चर्य
५३. श्रेष्ठासन
५४. पाठदुखी दूर करणारे बी
५६. शाब्दिक चकमक
५८. कवड्यांची माळ (बैलाच्या गळ्यातील)
५९. समुद्राचा तळ
६१. सद्विवेकबुद्धी
६४. उपकार
६५. ओढणी
६६. ओटा, कट्टा
६७. सेवक
६८. वाळवंटातील जहाज
७०. हिंदी चित्रपटसृष्टीतील चिरतरुण 'उमरा-वजान'
७१. गोड असून वजन घटवण्यास उपयुक्त

## आडवे उत्तरे

१.रोगप्रतिबंधक ६.कोजागिरी ९.गल १०.पाल चुकचुकणे १२.तप ,१३.निबर १४.ललाट १६.चर १७.वेस १८.वात २०.गणेश २२.रग २४.बैलोबा २५.मारहाण २६.कलकल २८.कलणे २९.कपात ३१.सब ३२.मळ ३४.ददात ३५.चिनाब झेलम सतलज रावी बियास ४१.माता ४२.बेट ४३.कारभार ४६.कमला ४८.खोट ४९.बारदान ५२.रजक ५३.समर ५४.ओटा ५५.वातड ५६.वादळ ५७.निवारक ५९.साल ६०.इनामदार ६१.साज ६२.डावरा ६३.तारा ६५.दुपार ६८.उंदीर ६९.सारेगमप ७२.परतणे ७३.सपाट ७४.गुरखा ७५.धट्टकट्टा

## उभे उत्तरे

१.रोगनिवारक २.गलबत ३.बंडल ४.कपाट ५.चाकर ६.कोकलणे ७.जाणे ८.रीतसर ११.चुचकरणे १५.लाडोबा १९.आ बैल मुझे मार २०.गणक २१.शर्यत २३.गलबत २५.माल २७.ललना २८.कळस ३०.पालवी ३१.सदासर्वदा ३२.मम ३३.सांज ३४.दया ३५.चित्रकार ३६.लता ३७.तबेला ३८.लट ३९.रागीट ४०.बित्तंबातमी ४४.रजनीनाथ ४५.भाक ४६.कमळ ४७.मर ४८.खोटारडा ५०.रड ५१.नवल ५३.सदर ५४.ओवा ५६.वादावादी ५७.निज ५८.कवडपट्टा ५९.सागरतळ ६१.सारासार ६४.पांग ६५.दुपट्टा ६६.पार ६७.दास ६८.उंट ७०.रेखा ७१.मध



# क्रीडा विश्व



# डेव्हिडच्या झंझावातामुळे ऑस्ट्रेलियाची विजयी सलामी



**डार्विन**–टीम डेव्हिडच्या (५२ चेंडूंत ८३ धावा) झंझावाती खेळीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने रविवारी झालेल्या पहिल्या ट्वेन्टी–२० क्रिकेट सामन्यात पाहुण्या दक्षिण आफ्रिकेवर १७ धावांनी मात केली. यासह तीन सामन्यांच्या मालिकेत ऑस्ट्रेलियाने १–० अशी आघाडी मिळवली.
अडखळत्या सुरुवातीनंतर डेव्हिडच्या आक्रमक खेळीमुळे ऑस्ट्रेलियाने २० षटकांत १७८ धावांची मजल मारली. आव्हानाचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेला २० षटकांत ९ बाद १६१ धावाच करता आल्या. रायन रिकल्टन (५५ चेंडूंत ७१) आणि ट्रिस्टन स्टब्स (२७ चेंडूंत ३७) यांचे प्रयत्न अपुरे पडले. ऑस्ट्रेलियाकडून बेन ड्वारशस (३/२६) आणि जोश हेझलवूड (३/२७) या वेगवान गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. मधल्या षटकांत अ‍ॅडम झॅम्पाची (२/३३) फिरकीही प्रभावी ठरली.

डढजठखएड धजण च–ध डखघए
ठळपर्ज्ञी डळपसह: कसं वाटलं सरप्राईज?
रिंकू सिंहचा सराव पाहण्यासाठी खासदार प्रिया सरोज यांची मैदानात एन्ट्री; पाहा तळवशे
डरपक्षी डरीप: तर मी तुला संघातून वगळेन, २ वेळा शून्यावर बाद झाल्यानंतर गंभीर सॅमसनला नेमकं काय म्हणाला? संजूने केला खुलासा
डरपक्षी डरीप: राजस्थान रॉयल्स माझ्यासाठी, संजू सॅमसनचं संघापासून वेगळं होण्याच्या चर्चांदरम्यान मोठं वक्तव्य; द्रविडबाबत म्हणाला

त्याआधी, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाला फलंदाजीचे आमंत्रण दिले. ऑस्ट्रेलियाची ३ बाद ३० अशी स्थिती होती. त्यावेळी कॅमरुन ग्रीनने (१३ चेंडूंत ३५) फटकेबाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांवर दडपण आणण्याचा प्रयत्न केला. परंतु चांगल्या सुरुवातीनंतर तो बाद झाला. यानंतर डेव्हिडने डावाची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्याने आठ उत्तुंग षटकार आणि चार चौकारांच्या साहाय्याने ८३ धावा फटकावत ऑस्ट्रेलियाला १७० धावांचा टप्पा ओलांडून दिला. दक्षिण आफ्रिकेच्या क्वेना मफाकाने (४/२०) भेदक मारा केला.

# करुण नायरने केले शुभमन गिलच्या नेतृत्वाचे कौतुक

नवी दिल्ली : इंग्लंडविरुद्धच्या भारताच्या कसोटी मालिकेत धीराने नेतृत्व केल्याबद्दल भारतीय फलंदाज करुण नायरने नवा कसोटी कर्णधार शुभमन गिलचे कौतुक केले आहे. इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेत करुण आठ वर्षांनी भारतीय संघात परतला. रोहित शर्मा आणि विराट कोहली कसोटी स्वरूपातून निवृत्त झाल्यामुळे आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या संघ–प्रथम धोरणामुळे भारत या मालिकेत बदलाच्या टप्प्यातून गेला होता.



करुणने इंग्लंड दौऱ्यापूर्वी २०१७ मध्ये भारतासाठी शेवटचा कसोटी सामना खेळला होता. पण देशांतर्गत क्रिकेटमधील चांगल्या कामगिरीमुळे त्याला पुन्हा भारतीय संघात सामील होण्याची संधी मिळाली होती. भारत आणि इंग्लंडमधील ही मालिका २–२ अशी बरोबरीत राहिली. करुणने गिलच्या कर्णधारपदाचे कौतुक केले आणि मालिकेदरम्यान भारतीय संघाच्या सातत्याचे श्रेय नव्या कर्णधाराला दिले आहे. करुण म्हणाला, मशुभमनने सर्वांना एकत्र ठेवण्याची पद्धत आणि त्याने दिलेले प्रोत्साहन कौतुकास्पद होते. सुरुवातीपासूनच त्याचा संवाद अगदी स्पष्ट होता. फलंदाज म्हणून त्याने जे काही साध्य केले आणि एक नेता म्हणून संघाचे नेतृत्व केले.फ पदार्पणाच्या कसोटी कर्णधार म्हणून गिलसाठी ही मालिका चांगली होती. भारताने पाचवा कसोटी सामना रोमांचक पद्धतीने जिंकला.ज्यामुळे मालिका बरोबरीत राखता आली.इतकेच नाही तर गिलने फलंदाजीनेही शानदार कामगिरी केली आणि ७५४ धावा करून मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला होता. त्याने एजबॅस्टन येथे द्विशतक आणि शतकही झळकावले. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत करुण नायर पहिल्या चार सामन्यांमध्ये आपल्या शानदार सुरुवातीचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करू शकला नाही. पण ओव्हल कसोटीत त्याने पहिल्या डावात ५७ धावांची महत्त्वाची खेळी खेळून प्रभाव पाडला. भारताच्या मालिका बरोबरीत आणणाऱ्या विजयात ही खेळी महत्त्व–

## थोडक्यात/ संक्षिप्त

### ‘या’ पाकिस्तानी क्रिकेटरला बलात्काराच्या आरोपात ब्रिटनमध्ये अचानक अटक

नवी दिल्ली: पाकिस्तानचा २४ वर्षीय क्रिकेटर हैदर अलीला बलात्कार प्रकरणात ब्रिटनमध्ये अटक करण्यात आली आहे. बलात्काराची घटना २३ जुलैला घडली होती. ३ ऑगस्टला हैदर अलीला ग्रेटर मँचेस्टर पोलिसांनी अटक केली. अटकेच्या वेळेत तो पाकिस्तान शाहीन्सकडून ३ ऑगस्टला बॅकेनहेममध्ये वनडे सामना खेळत होता.पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या विधानानुसार पोलिसांकडून सुरू असलेल्या तपासाची माहिती मिळाली आहे. पीसीबीने म्हटलंय की ते खेळाडूंची भलाई आणि कायदेशीर अधिकारांना अधिक प्राथमिकता देतात.यामुळे मंडळाने सुनिश्चित केले की हैदर अलीला कायदेशीर मदत दिली जाईल. यामुळे त्याची सुरक्षा आणि अधिकारांची रक्षा केली जाईल. तसेच जोपर्यंत तपास पूर्ण होत नाही तोपर्यंत हैदर अलीला अनिश्चित काळासाठी



निलंबित केले जात असल्याचा निर्णयही पीसीबीने घेतला आहे.हैदर अलीने २०२०मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने पाकिस्तानसाठी आतापर्यंत २ वनडे आणि ३५ टी–२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. टी–२०मध्ये त्याच्या नावावर ५०५ धावा आहेत. यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे. फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये त्याने २७ सामन्यांमद्ये १.७९७ धावा केल्या तर त्याची सरासरी ४७हून अधिक आहे.

***

### रोहित आणि विराटसाठी ऑस्ट्रेलियाचा दौरा शेवटचा ठरणार ?



मुंबई–भारताच्या इंग्लंड दौऱ्याआधी टी २० आणि कसोटी क्रिकेटमधून कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट कोहली या दोघांनी निवृत्ती जाहीर केली. आता रोहित आणि विराट फक्त एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत आहेत. ते चाळीशीच्या उंबरठ्यावर आहे. बीसीसीआयमधील सूत्रांकडून रोहित आणि विराट संदर्भात येत असलेल्या बातम्या जास्त उत्साहवर्धक नाहीत. त्यामुळेच भविष्यात रोहित आणि विराटसाठी एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणे कठीण होण्याची शक्यता आहे.
ऑक्टोबर २०२५ मध्ये भारत ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात भारत ऑस्ट्रेलिया विरोधात एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. हीच मालिका रोहित आणि विराटसाठीची शेवटची एकदिवसीय क्रिकेट सामन्यांची मालिका असण्याची शक्यता आहे. बीसीसीआयची निवड समिती २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी संघ तयार करण्याचे नियोजन करत आहे. या नियोजनात रोहित आणि विराटला स्थान नाही. शिवाय अनेक नवोदीत क्रिकेटपटू देशांतर्गत स्पर्धांमध्ये तसेच टी २० मध्ये चांगली कामगिरी करत आहेत. यामुळे विश्वचषकासाठीच्या संघाचा विचार करताना तरुण खेळाडूंना प्राधान्य दिले जाण्याची चिन्हं आहेत. या परिस्थितीत ऑक्टोबर २०२५ चा भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा हाच रोहित आणि विराटसाठीचा शेवटचा दौरा ठरण्याची शक्यता आहे.
ऑगस्टमध्ये बांगलादेशविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत रोहित आणि विराट दिसणार होते. पण हा दौरा सुरक्षेच्या कारणास्तव रद्द झाला आहे. यामुळे रोहित आणि विराट आता ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतच खेळताना दिसणार आहेत. भारत ऑस्ट्रेलियात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. या भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या स्पर्धेनंतर रोहित आणि विराट या दोघांना पुढे खेळण्यासाठी संधी मिळण्याची शक्यता कमी आहे.
पुढे आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळण्यासाठी रोहित आणि विराटला विजय हजारे ट्रॉफी लिस्ट ए स्पर्धेत भाग घेण्याचे बंधन घातले जाण्याची शक्यता आहे. या अटीचे पालन केले नाही तर रोहित आणि विराट या दोघांसाठी ऑस्ट्रेलियाचा दौरा हाच शेवटचा दौरा असेल असे वृत्त आहे.

## नीरजने या महत्त्वाच्या भालाफेकीच्या स्पर्धेतून घेतली माघार

नवी दिल्ली: भारताचा नीरज चोप्रा आणि पाकिस्तानचा अर्शद नदीम या दोघांनीही आगामी सिलेसिया डायमंड लीगमधून माघार घेतली आहे. त्यामुळे अ‍ॅथलेटिक्स चाहत्यांची घोर निराशा झाली आहे. या स्पर्धेतून माघार घेतल्याने दुहेरी ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्रा आणि पॅरिस ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता अर्शद नदीम यांच्यातील भारत–पाकिस्तान सामना होण्याच्या सर्व आशा धुळीस मिळाल्या आहेत.
जुलैमध्ये नदीमच्या उजव्या पायाच्या पायावर शस्त्रक्रियेनंतर या स्पर्धेत न खेळण्याचा त्याने निर्णय घेतला होता. पण नीरज चोप्राच्या माघार घेण्याचे कारण अजूनही अस्पष्ट आहे. ही स्पर्धा १६ ऑगस्ट रोजी पोलंडमधील सिलेसिया येथे होणार होती. नदीमने ९२.९७ मीटरच्या प्रचंड भालाफेकसह पॅरिस ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक



जिंकले होते. तर ८९.४५ मीटरची सर्वोत्तम कामगिरी नोंदवणाऱ्या नीरजला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते.
नीरजने २०२५ च्या हंगामाची चांगली सुरुवात केली आहे. त्याने दोहा डायमंड लीगमध्ये दुसरे स्थान मिळवून इतिहास रचला आणि ९० मीटरपेक्षा जास्त अंतरावर त्याचा पहिलाच थ्रो ९०.२३ मीटरपर्यंत पोहोचला. नीरजने पोलंडमधील जानुस कुसोसिन्स्की मेमोरियलमध्ये दुसरे स्थान मिळवून आपली लय कायम राखण्यात यश मिळवलं होतं. नीरजने बंगळुरूमधील श्री कांतीरवा आउटडोअर स्टेडियममध्ये आयोजित पहिल्या नीरज चोप्रा क्लासिकमध्ये विजय मिळवला होता. ही स्पर्धा त्याच्या सन्मानार्थ आयोजित करण्यात आली होती. दरम्यान, नीरज आणि अर्शद आता टोकियो येथे १३ ते २१ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या जागतिक अ‍ॅथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी तयारी करत आहेत.

## खेलो इंडिया अस्मिता हा क्रीडा क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठीचा एक सकारात्मक कार्यक्रम

मुंबई–केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांच्या हस्ते आज महाराष्ट्रात जळगाव इथल्या गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर खेलो इंडिया अस्मिता फुटबॉल लीग २०२५–२६ चे उद्घाटन झाले. क्रीडा क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठीचे एक महत्त्वाचे पाऊल म्हणून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या दिशेनेच सकारात्मक कृतीच्या भक्कम तत्वावर ही लिग स्पर्धा होईल. या तत्त्वाला धरूनच विविध समुदायातील युवा महिला खेळाडूंचा शोध घेणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हा या लिग स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.या संपूर्ण दिवसभराच्या स्पर्धात्मक उपक्रमाच्या निमित्ताने १३ वर्षाखालील खेळाडू एकत्र आले होते. यावेळी रक्षा खडसे यांनी उपस्थितांना संबोधित केले. ही लिग स्पर्धा म्हणजे आवडीचे कामगिरीत रूपांतर करणारा उपक्रम आहे, महिलांमध्ये क्रीडा क्षेत्राशी संबंधित दडलेल्या सुप्त प्रतिभेला’ वाव देणे हा या लीगचा उद्देश आहे असे त्यांनी सांगितले. पहिल्यांदाच खेळणाऱ्या खेळाडूंपासून ते आजही इतरांच्या नजरेत न आलेले विजेते, अशा प्रत्येकाला व्यासपीठ देण्यासाठीच या लीगची आखणी केली असल्याचे त्यांनी सांगितले.या लीगचे व्यापक उद्दिष्टही त्यांनी अधोरेखित केले. ही लीग स्पर्धा केवळ खेळापुरती मर्यादित नसून, अडथळ्यांवर मात करण्याच्या वृत्तीशीही संबंधित असल्याचे त्या म्हणाल्या. हा एक सकारात्मक कृती कार्यक्रम असून, यातून आदिवासी आणि अल्पसंख्याक समुदायांसह इच्छुक महिला खेळाडूंना प्रकाशझोतात आणण्यासाठी टाकलेले एक मोठे पाऊल असल्याचे त्यांनी सांगितले. खेलो इंडिया अस्मिता लीग हा’ खेलो भारत धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे, या उपक्रमाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणी आणि महिला सक्षमीकरणासाठी खेळांना प्रोत्साहन दिले जात आहे. ही लीग युवा मुलींसाठी एक समर्पित व्यासपीठ असून, यामुळे पूर्वापार चालत आलेला असमतोल दूर करून नवीन संधी निर्माण केल्या जात आहेत.जळगाव जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या सचिव केतकीताई पाटील आणि फारुख शेख यांच्यासह अनेक मान्यवर या लीगच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित होते. यासोबतच महाविद्यालयाच्या प्रशासनातील प्रतिष्ठित सदस्यही या समारंभात सहभागी झाले होते.

## ऑस्ट्रेलियाच्या मैदानात टीम डेव्हिडचं वादळ, दक्षिण आफ्रिकेला एकटा नडला!

डार्विन–मागच्याच महिन्यात वेस्ट इंडिजविरुद्ध ३७ बॉलमध्ये शतक ठोकणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या टीम डेव्हिडने आता दक्षिण आफ्रिकेविरुद्ध वादळी खेळी केली आहे. टीम डेव्हिडने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या टी–२० सामन्यात ८ सिक्स आणि ४ फोर मारत ८३ रन केले. ऑस्ट्रेलियाच्या मरारा क्रिकेट ग्राऊंडवर हा सामना झाला. १७ वर्षानंतर या मैदानात आंतरराष्ट्रीय मॅच झाली आहे. टीम डेव्हिडच्या या खेळीमुळे पहिल्या टी–२० सामन्यात ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला आहे.टीम डेव्हिडने ज्याप्रकारे दक्षिण आफ्रिकेच्या बॉलिंगवर आक्रमण केले, ते पाहता तो अगदी सहज त्याचं शतक पूर्ण करेल, असे वाटत होते.
पण १९व्या ओव्हरच्या दुसऱ्या बॉलला मफाकाने डेव्हिडची विकेट घेतली. टीम डेव्हिडने आधी २९व्या बॉलला त्याचे अर्धशतक पूर्ण केले, यानंतर त्याने थेट चौथ्या गिअरमध्ये बॅटिंग केली.
पाचव्या क्रमांकावर बॅटिंगला आलेल्या टीम डेव्हिडने ४ फोर आणि ८ सिक्स मारल्या, म्हणजेच ८३ पैकी ६४ रन त्याने बाऊंड्रीमध्येच काढल्या. टीम डेव्हिडने ५२ बॉलमध्ये १५९.६२ च्या स्ट्राईक रेटने बॅटिंग केली. टीम डेव्हिड जेव्हा बॅटिंगला आला तेव्हा ऑस्ट्रेलियाचा स्कोअर ७५६ होता, पण तो आऊट झाला तेव्हा टीमचा स्कोअर १६४८ एवढा झाला.
टीम डेव्हिडच्या या वादळी खेळीमुळे ऑस्ट्रेलियाने २० ओव्हरमध्ये १७८ रन केल्या. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून पहिले बॅटिंगचा निर्णय घेतला होता. दक्षिण आफ्रिकेकडून युवा फास्ट बॉलर क्वान मफाकाने सर्वाधिक ४ विकेट घेतल्या, तर कागिसो रबाडाला २ विकेट मिळाल्या. जॉर्ज लिंडे आणि सेनुरन मुथ्थुस्वामीला १–१ विकेट घेण्यात यश आलं. दक्षिण आफ्रिकेच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याला याच टी–२० मॅचपासून सुरूवात झाली आहे. दोन्ही देशांमध्ये ३ टी–२० मॅचच्या सीरिजनंतर एवढ्याच सामन्यांची वनडे सीरिजही खेळवली जाणार

## क्रिकेटच्या पलिकडेही जग असते १४,०५० धावा अन् ३५ शतके,

### तरी टीम इंडियाच्या या खेळाडूने का घेतली निवृत्ती?

दिल्ली–भारतीय क्रिकेटच्या इतिहासात अनेक असे खेळाडू असे आहेत, ज्यांनी घरगुती क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली. पण राष्ट्रीय संघात संधी मिळाली नाही. अशा खेळाडूंपैकी एक म्हणजे गुजरातचा प्रियांक पांचाल. अनेक वर्षांच्या वाटेवर त्याला अखेर २६ मे २०२५ रोजी क्रिकेटला कायमचा निरोप द्यावा लागला.
क्रिकेटपेक्षा मोठं आहे आयुष्य
प्रियांक पांचालने नुकताच ३५ वर्षाच्या वयात क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचे कारण समजावून सांगितले. तो एक्स (पूर्वी ट्विटर) वर फॉलोअर्ससोबत मआस्क मी एनीथिंगफ या सत्रात बोलत होता, तेव्हा एका चाहत्याने त्याला विचारले की इतक्या लवकर निवृत्ती का घेतली? त्यावर प्रियांकने सांगितले की, प्रत्येक क्रिकेटरचे दोन करिअर असतात, खेळायचे आणि न खेळायचे. जेव्हा त्याला कळाले की तो भारतासाठी खेळू शकणार नाही, तेव्हा त्याने दुसरे करिअर लवकर सुरू करण्याचा आणि पुढे जाण्याचा निर्णय घेतला. शेवटी, आयुष्यात क्रिकेटपेक्षाही मोठी गोष्ट आहे.
पंचालने आपल्या क्रिकेट करिअरमध्ये भारत अ संघाचे नेतृत्व केले होते, काही वेळा वरिष्ठ टीममध्ये पर्याय खेळाडू म्हणून देखील गेला होता. इंग्लंडविरुद्ध भारतातील टेस्ट मालिकेत अभिमन्यु ईश्वरनसोबत त्याला रिझर्व सलामी फलंदाज म्हणून नावदेखील घेतले गेले. तो अनेकदा भारतीय रेड–बॉल टीमचा भाग होता, जिथे तो जखमी रोहित शर्माच्या जागी संघात होता.
१४,०५० धावा अन् ३६ शतके–प्रियांकने त्याच्या संपूर्ण करिअरमध्ये फर्स्ट क्लास, लिस्ट अ आणि टी–२० क्रिकेटमध्ये एकूण १४,०५० धावा केल्या. त्याने ३६ शतकं ठोकली आहेत. १२७ फर्स्ट क्लास सामने खेळताना त्याने ८,८५६ धावा आणि २९ शतकं केली. ९७ लिस्ट अ सामनेत ३,६७२ धावा व ८ शतकं तर ५९ टी–२० सामन्यांत १,५२२ धावा आणि ९ अर्धशतकं ठोकली. फर्स्ट क्लासमध्ये त्याचा सर्वोत्तम स्कोर नाबाद ३१४, लिस्ट अ मध्ये १३६ आणि टी–२० मध्ये ७९ होता.

# संजू सॅमसन राजस्थान रॉयल्समधून बाहेर पडणार?

**चेन्नई** : संजू सॅमसनने राजस्थान रॉयल्सला पत्र लिहून, मला रिलीज करण्यात यावे, अशी विनंती केली आहे. आयपीएल २०२६ स्पर्धा सुरू व्हायला अजूनही सात ते आठ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. पण या स्पर्धेआधी होणाऱ्या लिलावाआधी ट्रेडिंग विंडो खुली आहे. त्यामुळे एका संघातील खेळाडू दुसऱ्या संघात आणि दुसऱ्या संघातील खेळाडू आपल्या संघात घेण्याचा पर्याय फ्रेंचायझींसमोर उपलब्ध आहे. राजस्थान रॉयल आपल्या कर्णधाराला सोडण्यास इच्छुक नव्हते, पण संजूनेच ही विनंती केल्यानंतर ते काय निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे. संजूप्रमाणेच आर. अश्विनही चेन्नई सुपर किंगची साथ सोडण्याच्या तयारीत दिसत आहे. भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करणारा आर अश्विन गेल्या हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळताना दिसून आला होता. त्याला गेल्या



हंगामात १४ पैकी ९ सामने खेळण्याची संधी मिळाली होती. क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, आर अश्विन चेन्नई सुपर किंग्ज संघाची साथ सोडणार आहे. याबाबत त्याने फ्रेंचायझीला कळवल्याचंही म्हटलं जात आहे. मात्र अश्विन या संघाची साथ का सोडत आहे, याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. चेन्नई सुपर किंग्ज संघ आर अश्विनला दुसऱ्या

### चेन्नईकडून खेळण्याची शक्यता, अश्विनही संघातून बाहेर पडण्याच्या विचारात

संघासोबत ट्रेड करणार की त्याला लिलावात पाठवणार हे देखील स्पष्ट झालेलं नाही.
आर अश्विनने याच वर्षी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला होता. तो केवळ फ्रेंचायझी क्रिकेट खेळताना दिसून येत होता. काही दिवसांपूर्वी तो तामिळनाडू प्रीमियर लीग स्पर्धा खेळताना दिसून आला होता. गेल्या आयपीएल हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळताना त्याने ९ सामन्यांमध्ये ७ गडी बाद केले होते. या हंगामात अश्विनला हवी तशी कामगिरी करता आली नव्हती.
संजू सॅमसन चेन्नईकडून खेळणार?
संजू सॅमसन गेल्या काही वर्षांपासून राजस्थान रॉयल्स संघाचा भाग आहे. त्याला या संघाचं नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. मात्र आगामी हंगामापूर्वी त्याने या संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. राजस्थान रॉयल्सचे संघमालक आणि राहुल द्रविड याबाबत निर्णय घेणार असल्याचं म्हटलं जात आहे. संजू सॅमसन हा राजस्थान रॉयल्स संघाचा सर्वात यशस्वी कर्णधार आहे. त्याने राजस्थान रॉयल्स संघासाठी फलंदाजी करताना सर्वाधिक ३९३४ धावा केल्या आहेत. आता चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स संघ काय निर्णय घेणार, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# विविध मागण्यासाठी बँक मित्रांचे निषेधासह आंदोलन जिल्हा अग्रणी मॅनेजरला मागण्याचे निवेदन

**लातूर/प्रतिनिधी:** वित्तीय समावेशनाचे उद्दिष्ट ज्यांच्या विश्वासावर गाठण्यात सरकारला यश आले आज त्याच बँकमित्रांवरती आत्महत्येची वेळ आलेली आहे. कष्ट करणाऱ्या बँक मित्रांचे कमिशन खाणाऱ्या मध्यस्थ कंपनीला काढून टाकून आमची नियुक्ती प्रत्यक्ष बँकेकडून करण्यात यावी यासह विविध मागण्यासाठी दिनांक ८ ऑगस्ट रोजी बँक मित्रांनी संपूर्ण राज्यभरात काळ्या फिती लावून काम केले त्याचबरोबर आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकाला दिले.



'आज प्रत्येक क्षेत्रात कंत्राटीकरणाचे वारे वाहू लागलेले आहेत. त्याला बँकिंग इंडस्ट्री सुद्धा अपवाद नाही. एखाद्याने कष्ट करत राहायचे व त्या कष्टाच्या मोबदल्याचा मोठा हिस्सा कमिशनच्या रूपात दुसऱ्यानेच लुबाडायचा ही एक नवीन पद्धत कंत्राटीकरणाच्या माध्यमातून राज्य व केंद्र शासन प्रत्येक क्षेत्रात आणत आहे. पूर्वी बँकांमध्ये बँक मित्रांची नियुक्ती जी प्रत्यक्ष बँकेकडून होत होती ती आता कंत्राटदार कंपन्यांच्या मार्फत होते आहे. नफ्याची माळ जपणाऱ्या बँकांनी पैसे वाचवण्यासाठी बँक मित्रांचे कमिशन जवळपास निम्म्याने कमी केलेले आहे. त्यात भरीस भर म्हणून बँक मित्रांची नेमणूक ही कंत्राटदार कंपनीच्या मार्फत केली जात आहे. ज्यामुळे एखाद्या कामासाठी पूर्वी मिळणाऱ्या कमिशन रूपातील रकमेच्या निम्मी रक्कम सुद्धा बँक मित्रांच्या हातात पडत नाही. एकीकडे वाढती महागाई,वाढत्या जबाबदाऱ्या ,वाढत्या भौतिक अपेक्षा व त्याच वेळेला उत्पन्नातील घसरण यामुळे तयार होणाऱ्या आर्थिक ताणतणावातून अनेक बँक मित्र गळफास लावून घेत आहेत. निलेश गणोरकर हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. वर्धा जिल्ह्यातील बँक ऑफ महाराष्ट्राच्या तळेगाव शाखेतील निलेश गणोरकर या बँक मित्राने अशाच आर्थिक ताण-तणावातून आपले जीवन संपवले. कष्टकऱ्यांचे हात रिकामी ठेवणारे व कंत्राटदारांची घरं भरणारे हे कंत्राटी प्रारूप तात्काळ रद्द करण्यात यावे व बँक मित्रांची नेमणूक पूर्वीसारखीच प्रत्यक्ष बँकेकडून करण्यात यावी अन्यथा भविष्यात देशव्यापी तीव्र आंदोलन उभे राहील'' असा सज्जड इशारा बँक कर्मचाऱ्यांच्या नेत्या कॉ. रेशमा भवरे यांनी दिला. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापकांना निवेदन दिल्यानंतर त्या बोलत होत्या.

भारतात कौशल्यपूर्ण शिक्षण घेतलेल्या तरुणांची आज कमतरता नाही. त्यांच्या हाताला कायमस्वरूपी रोजगाराची गरज असताना राज्य शासन, केंद्र शासन व अनेक शासकीय उद्योग कंत्राटीकरणाच्या माध्यमातून तरुणांच्या हाताला कामं देत आहेत ज्यामध्ये ना नोकरीची हमी आहे नाही निश्चित वेतनाची. राष्ट्रीयकृत बँका भरपूर फायद्यात असताना सुद्धा केवळ खर्च वाचविणे व नफा वाढविणे यासाठी बँकांनी कंत्राटीकरणाचे हे नव भूत घेऊन आल्या आहेत.प्रत्यक्षरीत्या काम करणारे बँक मित्र उपासमारीने मरत असताना कंत्राटदार मात्र मालामाल होत आहेत.त्यामुळे कंत्राटदारांची घरे भरण्यासाठी आणखी किती निलेशचा बळी देणार आहात''असा रोकडा सवाल यावेळी महाराष्ट्र स्टेट बँक मित्राज असोसिएशनचे अंकुश जाधव यांनी केला. यावेळी कॉ.रेश्मा भवरे ,कॉ. महेश घोडके ,महेश यंदे , मारुती आकडे,राघवेंद्र डेबडवार , दत्ता चेवले, फारुक शेख , शिवशंकर पाटील यासह लातूर जिल्ह्यातून वीस ते तीस बँक मित्र उपस्थित होते.

## कांचनताई शिवाजीराव जवळगेकर यांचे निधन

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांच्या पत्नी सौ. कांचनताई जवळगेकर यांचे ८ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता हृदयविकाराच्या धक्क्याने लातूरच्या गॅलॅक्सी हॉस्पिटलमध्ये निधन झाले. त्या ६४ वर्षाच्या होत्या.



त्यांच्या पश्चात पती, दोन मुली एक डॉक्टर व एक शिक्षिका, एक मुलगा असा परिवार आहे. कांचनताई जवळगेकर ह्या हरंगुळ बु. येथील जि. प. शाळेवर केंद्र प्रमुख म्हणून सेवा करून निवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वाजता लातूर येथील खाडगाव स्मशानभूमी येथे विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे कुटुंबीय आणि प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य एस. पी. गायकवाड, डॉ. प्रशांत मानिकर, प्रा. दत्ता सोमवंशी, माजी आ. सुधाकर भालेराव, उदगीरचे माजी नगराध्यक्ष आर. बी. सोनकांबळे,माधव गादेकर, राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, लसाकमचे नरसिंग घोडके, डॉ. दिलीप भोगे, मारुती लांडगे, प्रा. पंडित सूर्यवंशी, बाळकृष्ण धायगुडे, ॲड. राजाराम वाघमारे, टी. एन. कांबळे, माजी संचालक नामदेव विराळे, राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, अंकुश गायकवाड, वसंत बीबीनवरे, गोरख शिंदे, आण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील क्षीरसागर, बाळू चव्हाण, एसआरटी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. दिंगबर नेटके, डॉ. मारुती गायकवाड, प्रा. अंकुश गायकवाड, डॉ. सुनील साळुंके, दयानंद कॉलेजचे उपप्राचार्य दिलीप नागरगोजे असे विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ग्रंथालय शास्त्राचे जनक एस.आर. रंगनाथन यांची जयंती साजरी



**लातूर/प्रतिनिधी:** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे ग्रंथालय शास्त्राचे जनक एस.आर. रंगनाथन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ग्रंथपाल डॉ. महावीर कटके यांनी रंगनाथन यांच्या जीवनचरित्र आणि कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी स्टाफ सचिव प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ.शाहूराज मुळे, डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ.कांतराव पोले, प्रा.हरिहर गायके, डॉ. अभिजीत बादाडे, डॉ.अंगद कोते, डॉ.अजित भांजी, डॉ. रणजित जाधव, प्रा.संदिपान चेवले, प्रा.महारूद्र बिडवे, प्रा. विवेक गोस्वामी, डॉ.वैशाली माढेकर, डॉ.जयदेवी पवार, प्रा.नंदा खरटमल, प्रा.शितल खोत, डॉ माधव गायकवाड, डॉ पांडूरंग मुंढे यांची उपस्थिती होती. शेवटी सर्वांचे आभार श्रीनिवास सगर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने अंध - दिव्यांगांना देवदर्शनासाठी अर्थसहाय्य




**लातूर/प्रतिनिधी:** सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने अंध व दिव्यांग व्यक्तींना देवदर्शन सहलीसाठी पंधरा हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले. यात्रा आणि देवदर्शन करण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला आहे. श्रावण मासाचे औचित्य साधून अनेक मंडळी विविध धार्मिक स्थळांना भेटी देऊन दर्शनासोबतच पर्यटनाचाही आनंद घेताना दिसतात. या आनंदापासून अंध आणि दिव्यांग व्यक्ती वंचित राहू नयेत, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने अंध व दिव्यांगांना देवदर्शन सहलीसाठी पंधरा हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले. या सहकार्याबद्दल अंध - दिव्यांगांनी शतशः ऋण व्यक्त केले आहेत. या प्रसंगी रोटरी क्लब लातूर सेंट्रल च्या वतीने रोटरी क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, लक्ष्मीकांत गौड, गिरीश ब्याळे, मिलिंद आंबेकर, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, स्वामी, मुंडे , साहेबराव मोरे, गिरीश गारटे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती.

## प्रशासकीय अधिकारी आणि पत्नींच्या संस्थेमार्फत शिलाई मशीन्सचे वितरण



**मुंबई/प्रतिनिधी:** प्रशासकीय अधिकारी व त्यांच्या पत्नींची संघटना आयएएसओडब्ल्यूए ही अखिल भारतीय स्तरावर कार्यरत असलेली ना नफा तत्वावर सामाजिक कार्यासाठी कटिबद्ध असलेली संस्था आहे. या संस्थेच्या महाराष्ट्र शाखेमार्फत शोभा अरुण नाईक आणि यास्मिन फिरोज मोमिन या स्वयंसाहाय्य गटातील दोन विधवा महिलांना शिलाई आणि कटर मशीनचे वितरण करण्यात आले. आयडीबीआयच्या सौजन्याने सीएसआरच्या माध्यमातून या मशीन्स देण्यात आल्या आहेत.

शुक्रवारी मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात या मशीन्सचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती अर्चना मीना, सचिव श्रीमती आर.विमला, खजिनदार झेबा नाईक, सुप्रिया छडगल यांच्यासह संस्थेच्या पदाधिकारी आणि सदस्य तसेच आयडीबीआयचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उत्तरकाशी भूस्खलन, पूरस्थिती; महाराष्ट्रातील पर्यटक सुरक्षित, बहुतांश पर्यटक राज्यात परतणार आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन

**मुंबई/प्रतिनिधी:** उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली आणि हर्षिल परिसरात मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या भूस्खलन व पुरस्थितीत अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. या पर्यटकांना जॉली ग्रँड विमानतळ आणि मताली कॅम्प येथे आणण्यात आले असून ते सुखरूप आहेत. उर्वरित एक पर्यटक श्रीमती कृतिका जैन यांचा शोध अद्याप सुरू असून त्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत. यामधील बहुतांश पर्यटक आज महाराष्ट्रात परतणार असून, काही पर्यटक त्यांच्या पुढील यात्रांसाठी रवाना झाले असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाराज हे उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यात धराली येथे घडलेल्या घटनेनंतर तातडीने राज्यातील पर्यटकांच्या मदत व बचाव कार्यासाठी दाखल झाले. राज्य शासनाने या घटनेदरम्यान विशेष नियंत्रण कक्ष सुरू करून नातेवाईकांकडून माहिती घेऊन या ठिकाणच्या राज्यातील पर्यटक नागरिकांना आवश्यक मदत पोहचवून ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यास प्राधान्य दिल्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले, उत्तरकाशीतील भूस्खलन, पूरस्थिती घटनेत राज्यातील सर्व पर्यटक सुखरूप आहेत, याचा आनंद आहे. राज्यातील लोक अडचणीत असतील, तर त्यांची सुरक्षितता ही आपली जबाबदारी आहे. त्यानुसार उत्तराखंड सरकार, स्थानिक पोलीस, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांनी राज्यातील एकत्रितपणे कार्य करून पर्यटकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले.

मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले, जे पर्यटक राज्यात परतणार आहेत त्यांची राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या समन्वयातून परतीची व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे उत्तरकाशी येथे अडकलेल्या पर्यटक नागरिकांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाला असल्याचेही श्री. महाजन यांनी सांगितले.

## रो. हेमंत रामढवे यांचा जालना येथे सन्मान




**लातूर/प्रतिनिधी:** रोटरी परिवाराचा सामाजिक कार्यात हिरीरीने सहभाग राहत असतो, ही बाब सर्वज्ञात आहेच. जालना येथे नुकत्याच पार पडलेल्या रोटरी परिवाराच्या आनंद उत्सव सोहळ्यात लातूर रोटरी परिवारातील रो. हेमंत रामढवे यांचा सन २०२४ - २५ शाळांचा डिस्ट्रिक्ट ३१३२ मध्ये उत्कृष्ट असिस्टंट गव्हर्नर म्हणून सन्मान करण्यात आला.

रोटरीचे डीजे डॉ. सुरेश साबू यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन हेमंत रामढवे यांच्या कार्याचा, संघटन कौशल्याचा गौरव करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना हेमंत रामढवे यांनी रोटरी परिवाराच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याकामी लातूरचा नेहमीच सिंहाचा वाटा राहिला आहे. समाजोपयोगी उपक्रमासोबतच गरजूंच्या मदतीसाठीही रोटरी परिवाराचे योगदान नेहमीच अतुलनीय असे राहत आले आहे व भविष्यातही रोटरी परिवार सतत विविध सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवेल ,असा विश्वास व्यक्त केला. यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, लक्ष्मीकांत गौड, गिरीश ब्याळे, मिलिंद आंबेकर, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, स्वामी, मुंडे , साहेबराव मोरे, गिरीश गारटे यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. या सर्वांचा या आनंद उत्सवात उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान व गौरव करण्यात आला.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी:** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्राणिशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे दि.०६ ऑगस्ट २०२५ रोजी ''जैवविविधता व तिचे संरक्षण'' या विषयावर वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत बी.एस्सी.पदवी व एम.एस्सी.पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

सदरील स्पर्धेत वैभवी कुलकर्णी व शेख सानिया या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक मिळविला, तर सुमैया शेख व भिसे संजना या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक मिळविला.भुरे ऋतुजा या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक मिळविला.सदरील वैज्ञानिक रांगोळी स्पर्धा घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.आर.व्ही. सोळुंके यांचेही मार्गदर्शन लाभले.या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा.शितल पाटील व प्रा.अश्विनी कांबळे यांनी काम पाहिले.यावेळी डॉ.रत्ना कीर्तने,डॉ.सुरज कोल्हे,डॉ.अमोल ठोसर,प्रा.शिलेश गावित,प्रा.प्रतिका धरणे,प्रा.आगलावे मनाली,बालाजी चित्ते,गोविंद सांगवे,नाना काळुंखे,सुजित अपसिंगेकर यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.





## मनपा आयुक्तांची रक्षाबंधन निमित शहरवासीयांना भेट; मालमत्ता कर १०० % व्याज/शास्ती माफी

**लातूर/प्रतिनिधी:** कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ताधारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुट योजना ही लागू करण्यात आली होती. सदरील सुटचा लाभ घेऊन आतापर्यंत १७ हजार हून अधिक मालमत्ताधारकांनी आपला कर भरणा केला आहे. परंतु अद्याप ही काही थकबाकीदार यांनी कर भरणा केलेला नाही. थकबाकीधारक नागरिकांसाठी मनपा सुवर्णसंधी घेऊन आले आहे .तेव्हा सर्व मालमत्ता धारकाना कळविण्यात येते की, रक्षाबंधन व स्वातंत्र दिनानिमित्त लागू केलेल्या फेस्टिवल ऑफर अंतर्गत दिं.९ ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत आपल्याकडील थकीत कर एक रक्कमी भरल्यास आकारण्यात आलेल्या व्याज/शास्ती मध्ये १०० टक्के सूट देण्यात आली आहे.

तरी या योजनेचा सर्व मालमत्ताधारकांनी लाभ घेवुन आपल्याकडील देय कराचा भरणा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पूर्णकृती पुतळ्याचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अनावरण सोहळा

## हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आ. रमेशआप्पा कराड यांचे आवाहन





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पूर्णकृती पुतळ्याचा भव्य दिव्य अनावरण सोहळा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते व इतर अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दि ११ ऑगस्ट २०२५ रोजी होणार असून या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. श्री रमेशआप्पा कराड यांनी केले.

महाराष्ट्राचे लोकनेते माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा पूर्णकृती पुतळा जिल्हा परिषदेच्या मुख्यालय इमारत परिसरात उभारण्यात आला असून शासकीय जागेत बसवण्यात आलेला मुंडे साहेबांचा पुतळा राज्यातील पहिलाच असेल, या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण येत्या सोमवार दि ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. सदर कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात येत असून पुतळा परिसरात अत्यंत सुंदर असे सुशोभीकरण करण्यात आले आहे. जाहीर कार्यक्रम दयानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात होत असून भव्य मंडपाची उभारणी होत आहे महिला पुरुष याकरिता स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली असून या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्वांना हा अनावरण सोहळा पाहता यावा यासाठी थेटप्रक्षेपण करण्यात येणार आहे. कार्यक्रमापूर्वी मुंडे साहेब यांच्या जीवनावर आधारित विविध गीतांचा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास लातूर जिल्ह्यासह आजूबाजूच्या परिसरातून मुंडे साहेबावर प्रेम करणारे असंख्य जण आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यासाठी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, राज्याच्या पर्यावरणमंत्री ना. पंकजाताई मुंडे, सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, माजी कृषीमंत्री आ. धनंजयजी मुंडे, माजी युवक कल्याण व क्रीडामंत्री आ. संजय बनसोडे, माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औश्याचे आमदार अभिमन्यू पवार, भाजपा प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आ. विक्रम काळे राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाचे अध्यक्ष गोविंदअण्णा केंद्रे, भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजप नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवसेना संपर्कप्रमुख अँड बळवंतराव जाधव, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख, शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, रिपाई जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांच्यासह महायुतीचे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमास जिल्हाभरातील भाजपासह महायुतीतील सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर मुंडे साहेबावर प्रेम करणाऱ्या सर्व स्तरातील नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे असेही आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

# विस्तार सेवा कार्य समिती अंतर्गत अनोखे रक्षाबंधन साजरे

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाच्या विस्तार सेवा कार्य समिती अंतर्गत आज दि. ०९ जुलै २०२५ वार शनिवार रोजी रक्षाबंधनाचे औचित्य साधून शहरातील पोलीस कर्मचारी, रुग्णालयातील कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांना सोडणाऱ्या वाहनांचे वाहनचालक व इतर कामगार यांना त्यांच्या कार्यस्थळी भेट देऊन इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थिनींनी तयार केलेल्या राख्या बांधण्यात आल्या. याप्रसंगी शहरातील नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे तसेच पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, पर्यवेक्षक राम जोशी, धनंजय कुलकर्णी व विस्तार सेवा कार्य समिती संस्था प्रमुख जितेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विस्तार सेवा कार्य समिती प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर, महादेव गोंदरकर, प्रल्हाद माले, प्रयागराज गरुड, रंजना साकोळे, प्रज्ञा नाईक, कांचन तोडकर, मेघा सूर्यवंशी, रोहित कुलकर्णी, यांनी परिश्रम घेतले.



## बहुजन समाज पार्टी जालना जिल्हा मातंग समाज भाईचाराचे जिल्हाध्यक्ष संतोष आव्हाड यांची नियुक्ती

**जालना/प्रतिनिधी :** बहुजन समाज पार्टीची समिक्षा बैठक दिनांक ९ ऑगस्ट २०२५, शनिवार रोजी दुपारी १ वाजता ४८८, शासकीय विश्रामगृह, अंबड चौफुली जालना येथे बसपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी डॉ.संतोष शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश प्रभारी संतोष आव्हाड यांच्या हस्ते मातंग भाईचारा जालना जिल्हाध्यक्षपदी संतोष आव्हाड यांना नियुक्ती पत्र देऊन यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहु महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे या विचारधारेवर मातंग समाज तयार करण्याचे काम करावे असे शेवटी डॉ.संतोष शिंदे यांनी सांगितले.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



३४५ राजकीय पक्षाची मान्यता रद्द...

### चिमटा दयाचा



लातूरात स्वच्छता मोहीम जोरात आहे ! गटारीतील कचरा रस्त्यावर दिसून येत आहे!! रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाली आहे!!!

# ला डेअरी लिसीअस व्हेंचर प्रा. लि. बाभळगाव येथे उत्पादन होत असलेले अमुलचे दूध व दुग्ध जन्य पदार्थ ठरत आहे ग्राहकाच्या विश्वासास पात्र

**मराठवाडा व कर्नाटक सीमेलगतच्या भागात यशस्वी घोडदौड, शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायासाठी मिळत आहे आधार**






**लातूर/प्रतिनिधी :** जगभरात आपल्या दर्जेदार उत्पादनातून सर्वांच्या मनात घर केलेल्या अमुल या ब्रॅडने मराठवाड्यात देखील सर्वांची पसंती मिळवली असून ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरली आहे.

ला डेअरी लिसीअस व्हेंचर प्रा. लि.बाभळगाव येथे धिरज विलासराव देशमुख यांच्या पुढाकाराने अमुल कंपनीची विविध उत्पादने ९ ऑगस्ट २०२३ रोजी सुरू करण्यात आली.

सगळीकडे भेसळयुक्त दुधाची विविध उत्पादने मिळत आहे अशी ओरड नागरिकांकडून होत असताना त्याला अपवाद ठरत अमुल कडून दर्जे दार व पोषक असे दुध पुरवले जात आहे त्यामुळेच आज ३० हजार लिटर प्रतिदिन विक्री दुधाची होत आहे. सुरूवातीला केवळ ८ हजार लिटर एवढी विक्री होत होती. विक्री मध्ये झालेली वाढ ही निश्चितच ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतिक मानले जात आहे.

आपल्या मराठवाड्यातील शेतक-यांना शेतीपूरक व्यवसायातून अधिकचा आर्थिक लाभ मिळावा यासाठी साबर डेअरी ला लागणारे योग्य ते सहकार्य आपण करणार असे प्रतिपादन ला डेअरी चे चेअरमन श्री धिरज विलासराव देशमुख यांनी केले आहे. अमुलशी करार झाल्यानंतर गुणवतेशी कसलीही तडजोड न करता ग्राहकांना चांगल्या प्रतीचे दूधं व दुग्ध जन्य पदार्थ पोहोचतील या साठी भविष्यात पण अशाच पद्धतीने प्रयन्तशील राहणार असल्याचे सांगितले.

मागील २ वर्षांपासून सुरु असलेल्या प्रयत्नामुळे आज हे यश मिळाले आहे. या साठी प्रयत्नशील असणारे अमूलचे अधिकारी,साबर डेअरी चे अधिकारी व ला-डेअरी चे सर्व अधिकारी यांचे अभिनंदन धिरज विलासराव देशमुख यांनी केले आहे.


टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


# रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने मोफत लसीकरणास उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल व श्री पेट ऍनिमल क्लिनिकच्या संयुक्त विद्यमाने वर्ल्ड कॅट डे चे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या मोफत रेबिज लसीकरण उपक्रमात १२४ मांजरीचे लसीकरण केले गेले. या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लातूर शहरातील औसा रोडवरील दत्त मंदिराशेजारी असलेल्या क्लिनिकमध्ये सदर उपक्रम राबविण्यात आला. आज श्वानाबरोबरच अनेक घरांमध्ये मांजरही पाळली जाते. कोणताही पाळीव प्राणी असला तरी त्याच्यापासून कुटूंबातील कोणालाही संसर्ग होता कामा नये, याकरिता पाळीव प्राण्यांचे योग्यवेळी रेबीज लसीकरण होणे गरजेचे असते. त्यामुळे रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी रोटरी क्लब लातूर सेंट्रल च्या वतीने रोटरी क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, प्रकल्प प्रमुख भिमाशंकर गाढवे,लक्ष्मीकांत गौड, गिरीश ब्याळे, मिलिंद आंबेकर, मेहुल कामदार, राजगोपाल मुंदडा, स्वामी, मुंडे , साहेबराव मोरे, गिरीश गारटे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# क्रांतीदिन व रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात पाचवी ते सातवी विभागात क्रांतीदिन व रक्षाबंधन हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भारतमाता व क्रांतिकारकांच्या प्रतिमापूजन आणि वृक्षास राखी बांधून करण्यात आली. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात मुलींच्या हस्ते मान्यवरांना राखी बांधण्यात आली.

याप्रसंगी मंचावर विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक अंजली निर्मळे, राम जोशी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात कु.ओवी जगताप(७ वी ब ) या विद्यार्थिनीने राणी चन्नम्मा यांचे स्वगत व्यक्त केले. क्रांतीदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी बनवलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या राख्यांच्या प्रदर्शनीची पाहणी केली .पाचवी ते सातवी विभागातील ३० तुकड्यांमधील ३० विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकाच्या वेशभूषेमध्ये स्वगत सादर केले.

विद्यार्थ्यांना क्रांतीदिनानिमित्त अनेक क्रांतिकारकांची जवळून माहिती जाणून घेता आली तसेच प्रत्येक वर्गातून विद्यार्थ्यांनी एकमेकांना राखी बांधली. हा क्रांतीदिन व रक्षाबंधनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात वर्गा- वर्गामध्ये साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय, स्वागत व सूत्रसंचालन श्वेता अयाचीत यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख मीरा चामवाड, कलोपासक मंडळ प्रमुख तेजस्विनी मुंडे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### तोबा गर्दी ..

सणवारात अचानक
नेतोबांची तोबा गर्दी
थोडेफार जरीहीखरे
सहेतुक आली अर्धी

दारा पाशी इलेक्शन
मतदात्यां लावे नादी
सर्व पक्षीय जमलेले
भलीमोठी असेयादी

उत्सावा शिरेउत्साही
प्रत्येकाला प्रिय गादी
कधीसंपूर्ण लपाछपी
कधी स्पष्ट साळसुधी

जात धर्म नाही सिमा
असेसकला आझादी
फाटूनिनिघतो बुरखा
उघड होते सत्य कधी

हव्यासाची सवय जडे
लपवणारं कशीव्याधी
स्वच्छ राज कारणार्थ
कुठूनशोधावी औषधी

उत्सवात मिसळापण
असोअंतर्मनात शुध्दी
पावित्र्य पाळी सणाचे
राज्यकर्ते जर मुत्सद्दी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.


निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६